

# श्री साईलीला

ंबर

किं. ५० पै.

१९७०

## या अंकांत—

१ 'ज्ञानदीप लावूं जगीं'
२ योगिराज श्रीगुळवणी महाराजांचा परिचय
३ ज्ञानदीप लावूं जगीं — लेखांक दुसरा
४ ईश्वरसाक्षित्वाच्या खुणा
५ आमच्या गुरुजींनीं काय सांगितलें?
६ आत्मज्ञान – महत्व आणि प्राप्ति
७ आचार्य विनोबा भावे
८ कांहीं मननीय व आचरणीय
९ 'मज विश्वंभर बोलवितो'
१० मुंडकोपनिषद् आणि विज्ञान
११ गीतेचें सारभूत मार्गदर्शन
१२ शिरडीची वाट



# श्री साई वाक्सुधा

बाबा आपल्या भक्तांवर कधीं कधीं भयंकर रागावत असत; परंतु तो राग क्षणांत नाहीसा होत असे. त्यांच्या मनांत आपल्या भक्ताबद्दल संपूर्ण करुणा वास करीत असे. आई वेळप्रसंगी आपल्या लेकराला मारझोड करते; परंतु तें त्यांच्या भल्यासाठी करत. बाबा म्हणत असत कीं, मी माझ्या भक्तांचा अंकित, त्यांचा दासानुदास आहें. मी सदैव त्यांच्या सन्निध उभा असतो. मी केवळ त्यांच्या प्रेमाचा, निष्ठेचा भुकेला आहें. त्यांनी हांक मारतांच त्यांच्या हांकेला ओ दिल्याशिवाय मी कधीही राहत नाही.

—श्रीसाईसच्चरित

---


## श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक. ]

वर्ष ४९ वें ] नोवेंबर १९७० [ अंक ८ वा

: संपादक :

**श्री. द. दि. पाटणकर**

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

**साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ,**

**प्लॉट न. ८०४ बी, दादर, मुंबई १४**

# 'ज्ञानदीप लावूं जगीं'

**प्रिय वाचक—**

दिवाळीच्या आठवड्यांत प्रामुख्यानें आठवण कशाची व्हायची ? दिव्यांच्या लखलखाटाची,फटाक्याची आणि फराळाची ! साईबाबाना दिवाबत्ती लावण्याची, अंधार घालवून त्या ठिकाणी प्रकाश आणण्याची व सतत धुनी पेटवून तिच्या जवळपास बसण्याची भारी हौस होती. ज्ञानदीप पाजळून भक्तांच्या मनातील अज्ञानांधकार दूर करण्यासाठी त्यांचा अवतार होता.

शिरडीत आगमन झाल्यानंतर काही दिवसांनी त्यांच्या तेथील अस्तित्वाची व ते कोणी तरी महापुरुष आहेत याची शिरडीतील लोकाना जाणीव झाली ती त्यांच्या पणत्या पेटविण्याच्या रोजच्या आवडत्या छंदामुळे. ते सध्यासारखे दिवाळीचे दिवस नव्हते; परंतु साईबाबा सारख्या सत्पुरुषाला काय ? त्यांची रोजचीच दिवाळी ! सायं-काळ झाली म्हणजे एक बुधला घेऊन गावांतील चार दुकानदाराकडे जावयाचें. त्याच्या कडून तेल मागून घ्यायचे आणि आपल्या नित्याच्या निवासस्थानी पणत्यांची रांगच रांग पेटवायची ! रांगेनें लावलेल्या किंवा एकाद्या दीपमालेसभोवार लाव-लेल्या पेटत्या पणत्यांची शोभा किती नयनमनोहर दिसत असते नाही का ? ती शोभा किंवा त्यांची सर विजेच्या बत्त्यांना यायची नाही.

आपण दिवाळीच्या २।३ दिवसात घरोघर पणत्या लावतों व त्यां प्रकाशांत वावरत असतां आनंदून जातो; परंतु बाबांचा हा त्या काळांतील नित्यक्रम होता.

पणत्या लावून झाल्या म्हणजे दूर उभे राहून बाबा त्यांच्याकडे न्याहाळून डोळे भरुन पहात उभे रहायचे. भक्तांच्या अंतःकरणात असेच ज्ञानदीप पेटावे व त्यामुळे त्याना जो आनंद होईल त्यात आपणही सहभागी व्हावे हे बाबांचे जीवन कार्य होते.

एके दिवशी या नित्य क्रमाला खंड पडतो कीं काय असें वाटूं लागलें; परंतु ठायीं ठायीं दीप पेटवून अंधकाराचा नायनाट करण्यासठीं ज्यांचा अवतार ते थोडेच डगमगणार !

दुकानदारांनीं एके दिवशीं एकत्र जमून निश्चय केला कीं रोज रोज या फकिराला तेल आणि तेही फुकट कां म्हणून द्यावयाचे ? आम्हीं तेल द्यायचें आणि आमच्या जिवावर उदार होऊन यानी पणत्या पेटवायच्या ! ते कांही नाही यापुढे तेल देणें बंद !

बाबा नित्याप्रमाणे सायंकाळीं हातीं बुधला घेऊन तेलासाठीं दुकानदारांकडे गेले. त्यानीं आगाऊ ठरवून ठेवल्याप्रमाणें, त्याना नकार दिला. बाबा मोकळा बुधला घेऊन द्वारकामाईत परत आले.

परत आले ते कांहीं हात जोडून निराशेनें स्वस्थ बसून राहिले नाहीत. नित्याप्रमाणें पणत्या तर पेटल्या पाहिजेत. लखलखाट झाला पाहिजे. लोकांना दिव्य दिवाळीचा आनंद, दिवाळीचे दिवस नसतांही लुटता आला पाहिजे. काळोख देशोधडीला लागला पाहिजे. प्रत्येकाच्या अंतःकरणांत प्रकाश पडला पाहिजे.

मग बाबांनी काय केले ? तेल नाहीं तर नाही, त्यानी तेंच भांडें भरून पाणी घेतलें आणि तें प्रत्येक पणतींत घालून त्यानीं त्या पणत्या पेटविल्या !

दूर उभे राहून असंख्य लोक बाबांची ही लीला पहात होते. त्यांत गावांतील लोक होते. त्याचप्रमाणें तेल न देणारे दुकानदारही होते. त्याना तेल न देऊन आपण बाबांची कशी फजिती केली व पुढें ते काय करतात हें पहावयाचे होते. उलट त्यांचीच फटफजिती झाली ! सारे लोक व ते दुकांनदार आश्चर्यानें थक्क झाले त्यांचा आपल्या डोळ्यावर विश्वास बसेना. हें कसें घडलें याचा समज त्याना पडेना. हा दिसतो व वाटतो तसा कोणी साधा नसून हा सत्पुरुष आहे. हा मानवातील देव-पुरुष आहे असें त्याना वाटू लागले. शिरडीत आगमन झाल्यानंतर लोकांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालून व त्यांच्या मनांतील काळोख नाहीसा करून त्यांना प्रकाश दाखविण्याचा हा त्यांच्याकडून घडलेला पहिला चमत्कार होय.

अज्ञानाचा काळोख नाहींसा करून त्याठिकाणी ज्ञानाचा प्रकाश प्रज्वलित करणें हें बाबांचे जीवन कार्य होतें. तें कार्य त्यांनी अविरत केलें व आजही ते देहानें दृष्टिआड झाले असले तरी तेंच त्यांचे कार्य अव्याहत चालू आहे.

दिवाळींत आपण जिकडेतिकडे दिव्याचा झगझगाट पहातो. त्यावेळीं आपल्या अंतःकरणांतील अज्ञानाचा, अहंकाराचा काळोख नाहींसा करण्याचा व ज्ञानदीप प्रज्वलित करण्याचा आपण निर्धार केला पाहिजे. आपले अंतःकरण शुध्द व पवित्र बनविले पाहिजे.

‘ साधुसंत येती घरा, तोचि दिवाळी दसरा ’ आमच्या प्रिय वाचकाना व बाबाच्या भक्तांना हें सांगितलें पाहिजे काय ?

बाबांचें पुण्यदायी स्मरण आम्हाला सतत व अखंड होत राहिले पाहिजे. त्याने आमच्या अंत करणांत कायमचें घर केलें पाहिजे. त्यामुळे आम्हाला जो दिव्यानंदाचा लाभ होईल त्याची तुलना दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या आनंदाशी करतां येणार नाही.

# योगिराज श्रीगुळवणी महाराज यांच्या जीवनकार्याचा उद्‌बोधक परिचय

( लेखांक २ रा )

लेखक :—श्री. द. सा. मांजरेकर, चेंबूर

याच सुमारास बार्शी येथें काशीचे ब्रह्मचारी योगी योगानन्द यांचें आगमन झालें. यांची भगवन्त मंदिरामध्यें गीतेच्या ६ व्या अध्यायावर झालेली प्रवचनें जाणकरांनां फारच आवडलीं. वैदय मास्तर व वामनराव सुद्धां या प्रवचनांस हजर



रहात असत व योगानन्दांच्या दर्शनाला जात व त्यांच्या बरोबर योगविषयक चर्चा करीत. अशाच एका चर्चेच्या वेळी योगानंदांकडे योगाचे शिक्षण घेण्याच्या उद्देशाने वारंवार येणाऱ्या कांही शाळकरी मुलांस योगानंदांनी वामनरावजीकडे योगशिक्षण घेण्याचा सल्ला दिला. “मुलांनो तुमचे हे ड्रॉईंग शिक्षक गुळवणी चांगले योगी आहेत. तेच तुम्हाला योगाचे शिक्षण देतील.” असे उद्गार त्यांनी काढले. योगानंदांच्या प्रोत्साहवाने वानमरावजीनी बार्शी येथे योगशिक्षणाचा वर्ग उघडला. सुरवातील उपस्थिति चांगली होती; पण पुढे कांदालसून, चहाकॉफी यांचा त्याग वगैरे आहारविषयक निर्बंध सर्वांनाच पेलेनात व वर्गांतील उपस्थिति हळू हळू कमी कमी होऊ लागली. बार्शीच्या वास्तव्यामध्ये वामनरावजीचा व ह. न. प. दासगणू महाराजांचा स्नेह जमला. दासगणू महाराजांचें वामनरावरावजीवर फार प्रेम होतें.

## विशेषयोगाभ्यासाचें शिक्षण

प. पू. टेंबेस्वामीच्या निजानंदी गमनानंतर वामनरावजीचा पुढील योगाभ्यास खंडित झाला होता. यापुढील योगाच्या पायऱ्या अतिशय कठीण असून योग्य गुरूच्या मार्गदर्शनाशिवाय त्यांचा अभ्यास करणे अत्यंत धोक्याचे आहे. कालांतराने श्रीक्षेमपुष्कर येथील साक्षात्कारी योगी प. प. ब्रह्मानंदस्वामी याचेजवळ महिनाभर राहून वामनरावजीनी पुढील योगाभ्यास शिकून घेतला. नंतर कुंडलिनी जागृत करून घेण्याच्या उद्देशाने वामनरावजी हुशंगाबाद येथें गोविंद महाराज याचेपाशी आले. वामनरावजीची योगाभ्यासांतील अपूर्व तयारी, त्यांचे कडक ब्रह्मचर्य, उपासना सदाचार व शास्त्रनिष्ठा यांमुळे गोविदमहाराज प्रभावित होऊन त्यांनी कुंडलिनी चालनाचा हटयोगान्तर्गत श्रेष्ठ प्राणायाम वामनरावजीना शिकविण्यास प्रारंभ केला.

याच सुमारास हुशंगाबादेंतील मंगळवार घाटावर एक तरुण बंगाली संन्यासी आले होते. हे स्वामी वयानें फारच लहान होते. पण त्यांच्यांतील योगकांति येवढी विलक्षण होती की त्यांच्या तेजस्वी नजरेला साधारण माणूस नजर देऊ शकत नसे. हुसंगाबादचे सेवानिवृत्त न्यायाधीश दादासाहेब परांडे यांजकडून कळलें कीं हे बंगाली स्वामी तंत्रशास्त्रांतील वेध दीक्षा देण्यास समर्थ गुरु आहेत. दादासाहेब परांडे यांचेच एक स्नेही श्री नारायण प्रसाद वकील यांस अशी वेध दीक्षा देण्याचें या बंगाली स्वामीनीं मान्य केलें. त्यावेळीं वामनरावजी वगैरे मंडळी तेंथें हजर होती. स्वामींच्या समोर डोळे मिटून बसल्यानंतर स्वामींच्या कृपाप्रसादानें नारायण प्रसादांची कुंडलिनी शक्ति तत्क्षणीच जागृत होऊन त्याच्या शरीराकडून हठयोगांतर्गत अनेक क्रिया आपोआपच होवूं लागल्या व त्यांस विविध अनुभव येवूं लागले. हा सर्व प्रकार पाहून स्वामींचा योग मार्गांतील अधिकार मोठा आहे याची वामनरावजींना खात्री पटली व ते वरचेवर स्वामींकडे येवूं जावूं लागले. उपरोक्त घाटावर स्वामींच्या रहाण्याची बरीच गैरसोय होत होती म्हणून वामनरावजीनी स्वामींना स्वतःच्या बिऱ्हाडीं येऊन रहाण्याची विनंती केली व स्वामीनीं तीं मान्य केली. या काळामध्यें स्वामीनीं परांडेसाहेब प्रभृति बरेच जणांना शक्ति दीक्षा दिली.

## शक्तिपात दीक्षेनें कृतार्थता

या वेळी वामनरावजीचा योगाभ्यास गोविंद महाराजांच्या मार्गदर्शनाखालीं चालू होता.पण पुढील अभ्यास स्वामींच्या मार्गदर्शनाखालीं व्हावा म्हणून वामनरावजी

फार आतूर झाले होते. पण स्वामीनी गोविंद महाराजांच्या कार्यक्रमामध्यें ढवळाढवळ करण्यास नकार दिला. वामनरावजीची योगाभ्यासांतील तयारी, त्यांची शास्त्रनिष्ठा व आचार संपन्नता स्वामींच्या नजरेस आलेली होती. त्यामुळें त्यांचेंहि चित्त वामन-रावजीच्या विनवणीमुळें द्रवलें व एकेदिवशी स्वामीनीं वामनरावजीनां शक्तिपात दीक्षा देऊन कृतार्थ केले. यावर्षी वामनरावजी आपला प्रतिवर्षीचा गुरुद्वादशीला वाडीला जाण्याचा कार्यक्रम पार करू शकले नाहीत. पण हें दत्तप्रभूंच्याच इच्छेनें घडलें असें मानून वामनरावजी बंगाली स्वामींच्या सान्निध्यांत राहिले. हे बंगाली स्वामी म्हणजेच प. पू. श्री लोकनाथतीर्थ तथा प. प. श्रीमतच्चिन्मयानंद सरस्वति होत.

## योगी लोकनाथ तीर्थांची पूर्ण कृपा

हुसंगाबादेतील मुक्काम आटोपून वामनरावजी पुनः बार्शीला आले. आता त्यांचा व स्वामी लोकनाथतीर्थ यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा ऋणानुबंध निर्माण झाला होता. त्यामुळे वामनरावजीच्या आमंत्रणावरून लोकनाथतीर्थांनी बार्शी येथे वामन रावजीच्या घरी मुक्काम केला. स्वामी लोकनाथतीर्थ हे आपुल्यासारिखे करिती तात्कळ या कोटीतील गुरु होते. त्यांच्या स्पर्शानें बामनरावजीचे सुवर्ण तर झालेंच होते. आतां त्यांना परितत्त्व प्राप्त व्हायचे राहिलें होते व तेहि श्रीलोकनाथतीर्थ स्वामीनी दयाळू अंतःकरणानें वामनरावजीना प्रदान केलें. बार्शी येथील वामनरावजीच्या योगशिक्षण वर्गातील बापू कुबडे, व्यंकू कुळकर्णी व भास्कर भागवत हे निष्ठावंत विद्यार्थी यानाहि इच्छा झाली की आपणालाही श्रीस्वामीचा कृपाप्रसाद लाभावा. विशेषतः श्री. बापू कुबडे यांनी अतिशय आर्त होऊन स्वामीची प्रार्थना केली की आपणाला योगदीक्षा मिळावी पण त्यांचे लहान वय पाहून तूर्त नको असें स्वामीनी सांगितलें. स्वामीच्या नकाराने बापू कुबडे यांस फार वाईट वाटले व त्यांच्या नेत्रांतून अश्रू प्रवाह सुरू झाला. त्यामुळे दयार्द्र स्वामींचें मन विरघळलें व त्यांच्या श्रीमुखातून–तुम्हारी इच्छा पुरी होगी. वामनराव उनको देख लेव–असे ऊद्‌गार बाहेर पडले. याच ऊद्‌गारांनी सुवर्णाचे परिस झालें. वामनरावजी गुरुवर्य वामनरावजी गुळवणी महाराज झाले. दीक्षागुरु होण्याचा अधिकार वामनरावजीना प्राप्त झाला.

## महाराजांच्या जीवनात अनंत चतुर्दशीचे महत्त्व

श्रीगुळवणी महाराजांनी आपल्या दीक्षा गुरुत्वाची सुरवात एका सुवासिनील, अनंतचतुर्दशीच्या शुभदियशी योग दीक्षा देऊन केली. अनंतचतुर्दशीच्या दिवसाने

गुळवणी महाराजांच्या आयुष्यात अनन्यसाधारण असें महत्त्व आहे. याच शुभदिनी महाराजांना टेंबे स्वामी याजकडून अनुग्रह प्राप्त झाला होता आणि याच दिवशी त्यानी आपल्या दीक्षा गुरूत्त्वाला सुरुवात केली सौ.गोपिकाबाई शास्त्री यांना गुळवणी महाराजांच्या प्रथमशिष्या होण्याचा बहुमान मिळाला. तदनंतर श्री. व्यंकू कुळकर्णी श्री. बापूसाहेब कुबडे व भास्कर भागवत याही अनुग्रहीतांना कुडलीनी जागृतीचा फार चांगला अनुभव आल्यामुळें वामनरावजींना मोठे समाधान प्राप्त झाले. अशा तऱ्हेने उत्तर भारतात उगम पावलेली ही पावन गंगा महाराष्ट्रामध्ये आली व या गंगेच्या पावन प्रवाहामध्ये महाराष्ट्रातीलच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरील व भारताबाहेरील शेकडों नव्हे हजारो मुमुक्षू जीव आज उजळून निघाले आहोत.

श्रीगुळवणी महाराज अत्यंत नम्र व प्रसिद्धी पराङ्मुख असल्यामुळे त्यांच्या मध्यें अवतीर्ण होऊन सुध्दां संबंधितां पलिकडे त्यांचें नांव कोणाला कळले नाही. इतर सर्वांच्या दृष्टीनें ते श्रीगुळवणी ड्रॉईंग शिक्षक होते पण कस्तुरीचा सौरभ कुठवर लपून रहाणार ? नागपूरचे खरे शास्त्री यांना योगाची आवड होती व त्यांचा आणि श्रीगुळवणी महाराजांचा चांगला परिचय होता. हेच खरे शास्त्री पुढें चतुर्थाश्रम स्वीकारून श्रीशंकराचार्य पीठावर आले. त्यांनी गोरखपूर येथील कल्याण मासिकाच्या योगविशेषांकामध्यें एक लेख लिहून श्री गुळवणी महाराजांचा वेधदीक्षेचे प्रणेते म्हणून स्पष्ट उल्लेख केला.

## एक स्थानमाहात्म्य

सन १९२६ सालीं श्री गुळवणी महाराज पुणें मुक्कामी आले व तेथील नूतन मराठी विद्यालयामध्ये ड्रॉईंग शिक्षकाची नोकरी पतकरली. या शाळेत सन १९४२ पर्यंत महाराज शिक्षक म्हणून होते पुण्यांत महाराजांचा मुक्काम २० नारायण पेठ बिल्डींगमध्यें असे. शेजारी श्री भुजंगराव भालेराव व त्यांचें कुटुंब रहात होते. योगक्षेमं वहाम्यहम" या भगवन्ताच्या उक्ती प्रमाणें श्री गुळवणी महाराजांच्या कडक आचार व्रताचे पालन करण्यास त्यांना सहाय्यभूत होण्यासाटी याच जागेमध्यें जवळ जवळ गेली तीन तपें अनेक प्रकारची धार्मिक अनुष्ठाने झाली. अनेक वेळ अन्नदान झाले अनेक साधु सत्पुरुषाचे वास्तव्य येथें होऊन गेले. अनेक मुमुक्षूजीवांना आत्मोन्नतीचे साधन येथें प्राप्त झाले. याच जागेमध्यें प. पू श्री लोकनाथतीर्थ यांचें तीन वेळां वास्तव्य झाले. या अतिपावन जागेचा शेवट १९६१ सालच्या पानशेत धरण उत्पाता-

मध्ये झाला. जणू "हे विश्वचि माझे घर" अशा वृत्तीवर पोचलेल्या या थोर सत्पुरुषाला या नंतर चार भिंतीआड बंदिस्त राहून पुढील जगदोद्धाराचे कार्य पार पाडण्यांत व्यत्यय आला असता. १९६५ च्या जानेवारीमध्यें एरंडवणे येथें सर्व साधकांच्या साहिच्छेने बांधण्यांत आलेल्या श्री वासुदेव निवास या वस्तुमध्यें श्रीमहाराज रहावयास गेले.

प. पू. श्री लोकनाथतीर्थांची मनसोक्त सेवा करण्याचे भाग्य श्रीगुळवणी महाराजांना लाभले. श्रीस्वामींच्या सान्निध्यामध्यें महाराजांचा बराच काळ गेला. पुढे स्वामीचा काशी येथे वास असेपर्यंत दरमहा रुपये पन्नास गुरुसेवेसाठी श्रीमहाराज पाठवून देत. व श्री जांबवन्त सिह या शिष्यामार्फत स्वामींची उत्तम व्यवस्था ठेवली होती. स्वामींचा महानिर्वाण समय आला आहे असे समजतांच श्री. गुळवणी महाराज सोलापूर येथे होते तेथून ताबडतोब काशीला गेले. या वेळी देवांचे निमंत्रण स्वामीनी योग प्रभावानें टाळलें व पुढें माघ वद्य २ शके १८७६ रोजीं स्वामी स्वेच्छेनें स्वस्वरूपीं लीन झाले.

## महाराजांच्याठायीं असामान्य शक्ति

नूतन मराठी विद्यालयाच्या नोकरीतून सेवा निवृत्त झाल्यापासून श्रीगुळवणी महाराजांनी चारीधाम यात्रा केल्या. श्री क्षेत्र वाडी, तुळजापूर या वाऱ्या तर नेहमी होत असतात. वाराणशी या उत्तर भारताच्या क्षेत्रीं तर अनेक वाऱ्या झाल्या आहेत. या क्षेत्रीं श्रीमहाराजांचा फार मोठा शिष्यवर्ग आहे. श्रीबद्रिनारायण नेपाळांतील श्रीपशुपतिनाथ (ही यात्रा तर महाराजांनी याच वर्षी वयाच्या ८५ व्या वर्षी केली.) दक्षिणेतील गोकर्ण, रामेश्वर वगैरे सर्व तीर्थांच्या यात्रा श्रीगुळवणी महाराजांनी केल्या आहेत. कल्याण मासिकाच्या योगविशेषांकामध्यें श्री गुरुदेवांच्या शक्तिसंक्रमण विद्येविषयी खरे शास्त्र्यांचा लेख प्रसिद्ध झाल्यापासून महाराजांपाशी मुमुक्षु साधकांची रीघ लागली आहे. आजपर्यंत हजारों साधकांना महाराजांनी मुक्तीच्या पंथावर आणून सोडलें आहे. हे हजारों जीव शक्तिदीक्षेचा अमृत स्पर्श होऊन पावन झाले आहेत. आयुष्यभर यमनियमांची कठोर पाळणूक व हठयोगांतर्गत आसनें आणि प्राणायाम यांचा अभ्यास करूनही जी कुंडलिनी शक्ति जागृत होत नाही तीच शक्ति श्री गुरुदेवांच्या संकल्पमात्रेंकरून निमिषार्धांत जागृत होऊन साधकाला दिव्य आनंदाचा अनुभव प्राप्त करून देते. त्याची क्रमाक्रमानें मोक्षाकडे वाटचाल करविते.

श्री महाराजांमधील या असामान्य, ईश्वरीय शक्तीचा ज्या साधकांनी अनुभव घेतला आहे ते धन्य होत.

## जीवनांतील भव्य व मंगल प्रसंग

श्रीगुरुदेवांचा साधकवर्ग महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, गुजरात, कर्नाटकापासून अखिल भारतभर पसरलेला आहेच पण लंका, आफ्रिका अमेरिका वगैरे देशामध्येंहि श्री गुरुदेवांच्या अनुग्रहीतांचें वास्तव्य आहे. महाराजांच्या अनुग्रहीतांनी व चाहत्यांनी महाराजांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण झाल्यावर पुणें मुक्कामी स्वामी कुवलयानंदजी (कैवल्यधाम, लोणावळें) यांच्या अध्यक्षतेखाली एक महोत्सव साजरा केला. पुनः गुरुदेवांनी ८० वर्षे पूर्ण करून ८१ व्या वर्षामध्यें पदार्पण केलें त्यावेळी १९६७ मध्यें सहस्रचंद्र दर्शन शांतियाग प. पू १००८ श्री स्वामी विष्णुतीर्थ यांचे अध्यक्षतेखालीं पार पाडण्यांत आला. श्रीलोकनाथ तीर्थांचे गुरुदेव श्रीशंकर पुरुषोत्तम तीर्थ यांचे दुसरे शिष्य योगानंद यांचे श्री विष्णुतीर्थ हे शिष्य होत. या समारंभाचे वेळी पंडित सातवळेकरांनी सपत्नीक येऊन श्रीगुरुमहाराजांनां आशीर्वाद दिले. या नंतर महाराजांच्या मुंबई येथील साधकानी महायोग मंडळाच्या विद्यमानें ता. १४-४-६८ रोजीं एक समारंभ आयोजित करून बाळासाहेब भारदे यांच्या अध्यक्षतेखाली महाराजांना मानपत्र देऊन महाराजांचे अभीष्टचिंतन केले. श्रीवासुदेवनिवासचे एक ट्रस्टी व श्रीगुरुदेवांचे मानसपुत्र कै. नानासाहेब भागवत यांच्या अविश्रांत परिश्रमांमुळे हा समारंभ पार पडला. त्यावेळी श्रीगुरुदेवांचे मुंबईमध्ये जवळ जवळ दोन आठवडे वास्तव्य होते.

## विसाव्या शतकातील महान् चमत्कार

श्रीगुरुदेवांच्या वयाला आज ८५ वर्षे पूर्ण होऊन गेली आहेत. आयुष्यभर केलेले कठोर तपाचरण योगाभ्यास व उभे आयुष्य पाळलेले ब्रह्मचर्य यांमुळे महाराजांचे शरीर पूर्ण निरोगी, कार्यक्षम व तप्त सुवर्णाप्रमाणें कांतिमान आहे. आजहि मुंबईमध्ये आल्यावर दिवसाकाठी आठ आठ तास साधकांच्या घरी भेट देतांना जिन्याची सारखी चढ उतार करूनहि महाराजांचे शरीर कधी थकलेले दिसले नाही. श्रीमहाराजांनी कधी चमत्कार केल्याचे ऐकिवांत नाही तरी सुद्धा हजारो मुमुक्षू जीवांना त्यांच्या पावन दर्शनाने शांति लाभते. कित्येकांना आपले कूट प्रश्न आपोआप सुटल्याचे समाधान लाभते. आजच्या शिक्षणाने धर्म बुडत आहे असा

टाहो फोडणाऱ्यांना मला एवढेंच सांगावेंसें वाटते कीं श्रीमहाराजांच्या अनुयायांमध्ये सध्या सुशिक्षितांचाच भरणा फार मोठा आहे. महाराजांनी चमत्काराची खैरात करून ही माणसे आपल्या भोवती गोळा केलेली नाहीत. शक्ती दीक्षेच्या लोहचुंबकामुळे आकृष्ट झालेली भक्तांची ही मांदियाळी आहे. संकल्पमात्रे करून शक्तीपातदीक्षा ह्याच या विसाव्या शतकांतील एक महान चमत्कार आहे.

ॐ तत्सत्

( या लेखांतील मुख्य मुख्य घटना श्री. बापूसाहेब कुबडे लिखित श्री गुळवणी महाराजांच्या चरित्राच्या आधारे लिहिल्या आहेत)

# ज्ञानदीप लावूं जगीं

लेखक : **गणेश विष्णू कविटकर.** एम्. ए.

**( लेखांक दुसरा )**

सामाजिक दृष्टया नामदेवांच्या पदयात्रेचा असा एक परिणाम झाला की, या भागातील क्षत्रिय वर्णांतर्गत एक शाखा तेव्हापासून स्वतःस नामावंशी छीपा दर्जी असे म्हणवूं लागली. राजस्थानात नामदेवरायांच्या अनुयायांचे तीन प्रकार आहेत.



[ १ ] छींपी (शिंपी); [ २ ] दर्जी; [ ३ ] अन्य.

नामावंशी छीपा जमातीची वस्ती राजस्थानात विस्तृत प्रमाणात आहे. हे लोक सर्वत्र दिसून येतात. यांची प्रमुख केंद्रें: जयपूर, कोटा, सवाई माधोपूरे, करोली, सीसवाली, बारा अन्ता, कालावाडा, बगरू, सांगनेर, टोक, केकडी, देवली, मालपुरा, अजमेर इत्यादी ठिकणी मुख्यतः ते राहतात. एकूण नामदेवरायांच्या

अनुयायांची संख्या शहरांत दहा हजारांच्या वर आहे. याखेरीज नामादर्जी म्हणविणारे दोन हजार अनुयायी व अन्य पाचशेपर्यंत आहेत. राजस्थानात नव्याजुन्या स्वरूपांत जी नामदेव मंदिरे आज उभी आहेत ती छींपी समाजाने बांधलेली आहेत. नामदेवांचे अनुयायी अनेक संस्थांमार्फत राजस्थानात व्यापक प्रमाणावर कार्य करीत आहेत. नामदेवांच्या आदर्श जीवनाचा व त्यांच्या संदेशाचा प्रचार व प्रसार या संस्थाच्या द्वारा केला जातो. अशा संस्थांच्या नावांची यादी वाचकाच्या माहिती करता या लेखाच्या शेवटी ( परीशिष्ट अ ) जोडली आहे.

## राजस्थानातील नामदेव-मंदिरे

राजस्थानात नामदेवांच्या मंदिरांची संख्या १५० पेक्षा अधिक आहे. मराठी माणसाविषयी व महाराष्ट्र संतांविषयी नितांत आदर निर्माण करणारी ही अध्यात्म केंद्रेच आहेत. याठिकाणी हिंदी साहित्यिक एकत्र येऊन नामदेवांचे गुण संकीर्तन करतात. शीखांच्या गुरुद्वारांचे पुजारी प्रवचने करतात आणि नामदेवानुयायांची आठवड्यातून एक तरी बैठक होत असते. नामदेवांच्या नावाने ग्रंथालये-वाचनालये या केंद्रस्थानी आहेत. तेराव्या शतकात प्रत्येक पदयात्रेत नामदेवांनी वैष्णव पंथाचा प्रचार व प्रसार उत्तर भारतात मोठ्या प्रमाणात केला होता. त्याची ही मंदिरे आजहि साक्ष देतात. ही मुख्य मंदिरे अशी--

( १ ) श्रीनामदेव मंदिर, पुष्कर, जिला अजमेर (राजस्थान); (२) श्रीनामदेव मंदिर, रास्ता जाट का कुवा, जयपूर ( राज. ); ( ३ ) गंगापूर; ( ४ ) कोटा; ( ५ ) धोलपूर; ( ३ ) खिलचीपूर; (७) नरसिंह गढ (मध्य प्रदेश); ( ८ ) छीपा बडौद; ( ९ ) छपरा; ( १० ) झालर पाटन; ( ११ ) खानपूर; (१२) गुगल, जिला छापरा राज. (१३) जोधपूर; (१४) अलवर; (१५) बिकानेर (जवळ कोलायतजी येथील नामदेवांची विहीर;) बगरु; (१७) संगनिर; (१८) काळा डेरा; (१९) पन्न; (२०) छत्तरपू; (२१) सागर; (२२) बीना; (२३) सतना; (२४) पिंडरा ( गौरीका ); (२५) ललितपूर; (२६) सीतामंडी; (२७) ललितपूर; (२८) सारंगा; (२९) जबलपूर; ( ३० ) रिवा इत्यादि गावी लहान मोठी नामदेव मंदिरे आहेत.

कांही मंदिरे जुन्या स्वरूपात तर काही व्यवस्थेच्या अभावी मोडकळीस आलेली व कित्येक अलिकडच्या कालात उभारलेली आहेत.

नामदेवांच्या पदयात्रेचे परिणाम राजस्थानी साहित्यावरहि झाल्याचे दिसून येते.

प्रसिद्ध कवयित्री मीराबाई ( इ. स. १४९८ ते १५४६ ) यांनी नामदेवांचा भावपूर्ण शब्दांत निर्देश केला आहेः-

**म्हाँरे नैणाँ आगे रहजो जी श्याम गोविंद ॥ टेक ॥**
**दास कबीर घर बादल जो लाया, नामदेव की छान छबन्द।**
**दास धनाको खेत निपजाओ, गज की टेर सुनन्द।**
**सब सन्तो का काज सुधार, मीरा सुं दूर रहन्द॥** मीराबाई की शब्दावली, पृ. ३६

[ हे श्यामवर्ण गोविंदा ! माझ्या डोळयांसमोर तुम्ही रहा.. आपण कबीराच्या घरी बैल आणला, नामदेवांचे छप्पर शाकारून दिलेत, धन्नादासाच्या शेतात बी पेरलेत आणि गजेंद्राचा धावा ऐकून त्याच्या सहाय्यार्थ धावून गेलात ! सर्व संतांची कामे केलीत, परंतु मीराबाई पासून तुम्ही दूर रहाता ! ]

**हिंदु मुस्लीम ऐक्याचे प्रयत्न**

राजपुतान्यानंतर नामदेव वैष्णव मंडळासह भक्तिमार्गाचा प्रचार करण्यास प्रयाग, वाराणसी, गया इत्यादि क्षेत्रांच्या ठिकाणी गेले. यावेळी उत्तर भारतांत मुसलमानी सत्तेचे एकछत्र झाले होते. तत्परिणामीं भारतीय समाज दुभंगून गेला होता. नामदेवांनीं हिंदी भाषिकांच्या या प्रदेशांत कीर्तनसंस्थेच्या प्राचीन व्यासपीठावरून एकेश्वरवादाचा, विशुद्ध भक्तिचा, जाति—वर्ण—निरपेक्ष मानवधर्माचा आणि सदाचारपूर्ण जीवनाचा आदेश, त्याकालांतील लोकभाषेंत, हिंदी भाषेंत दिला. हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याचे प्रयत्न केले आणि मानवी समतेचा पुरस्कार केला. नामदेव जरी अधिकतर सगुणोपासक होते तरी त्यांची कित्येक पदें निर्गुणवादानें परिपूर्ण आहेत. आणि हिंदु—मुसलमानांच्या धर्मांधतेचा त्यांत उपहासच केलेला आढळतो. या दोन्ही धर्मांतील रुढिवादाचा व कर्मकांडाचा सौम्यपणें निषेध केलेला आहे.
उदाहरणार्थ या काव्यपंक्ती पहाः—

**पांडे तुमरी गाइत्री लोधे का खेतु खाती थी ॥**
**लै करि ढेगा टगरी तोरी लांगत लांगत जाती थी ॥ १ ॥**
**पांडे तुमरा महादेउ धउले बलद चडिआ आवतु था ॥**
**मोदी के घर खाणा पाका वाका लडका मारिआ था ॥ २ ॥**
**पांडे तुमरा रामचंदु सो भी आवतु देखिया था ॥**
**रावन, सेती सरबर होई घरकी जोइ गवाई थी ॥ ३ ॥**
**हिंदू अन्हा तुरकू काणा दुहां ते गिआनी सिआणा ॥**
**हिंदू पूजै देहुरा मुसलमाणु मसीत ॥**
**नामें सोई सेविआ जह देहुरा न मसीति ॥ ४ ॥**

[ हे पंडिता ! तुझी गाय एका लोध्याचे ( खेडवळाचे ) शेत खात होती. त्या लोध्यानें हातांत काठी घेऊन तिच्या पायावर मार दिला. लंगडत लंगडत जातांना तिला मी पाहिलें. हे पंडिता ! तुझा महादेव पांढऱ्या बैलावर बसून येत असतांना मी पाहिला. त्यानें वाण्याच्या (श्रियालाच्या) घरी मुलाला ( चिलिआला उखळांत घालून) ठार करून पाकसिद्धि केली. हे पंडिता ! तुझा श्रीरामचंद्रहि येतांना मी समक्ष पाहिला. त्यानें स्वतःची बायको गमावली आणि रावणाशी भांडण केलें. हिंदु आंधळे व तुर्कलोक तिरळे दोहोपैकीं जो ईश्वरास जाणतो तो शहाणा. हिंदु देवळांत देवाची पूजा करतात; आणि मुसलमान मशिदींत नमाज पढतात. पण मी नामदेव मात्र ज्याला देऊळ नाहीं आणि मशीदहि नाहीं, जो सर्वत्र आहे त्या ईश्वराची पूजा करतों. ]

यावरून संत नामदेव ब्रह्माची सगुण व निर्गुण दोन्ही स्वरूपें मानीत होते. याचे कारण, त्यांचा प्रयत्न हिंदु व मुसलमान या दोघांकरितां एक सामान्य धर्म प्रस्थापित करण्याचा होता. म्हणून त्याना आपल्या या सामान्य धर्मात हिंदूंकरिता सगुणोपासना व मुसलमानां करिता एकेश्वरवाद या दोन्हीनाही स्थान देणे आवश्यक वाटत होते. जो परमेश्वराची एकनिष्ठ सेवा करतो तो निर्भय आणि भक्तिपरायण होतो. त्याचे जीवन प्रेममय होते. भूतदया आणि सर्व भूतात आपण आहोत ही भावना आचरणात आणल्यास निर्वाणपद दूर नाही ही उदात्त व थोर शिकवण आपल्या शुद्धाचरणाने त्यांनी दिली. नामदेवांची ही पद यात्रा शके १२५९च्या सुमारास संपली.

शके १२६० वद्य ५ स नामदेवांचे शिष्य चोखामेळा मंगळवेढे येथे घराचे छप्पर कोसळून त्यात गाडले गेले. चोखोबांच्या अस्थी नामदेवानी गोळा केल्या आणि त्या पंढरपुरास आणून देवाच्या महाद्वारी या हरिजन संताचे कायमचे स्मारक केले. देशाच्या विकासांत अडथळा निर्माण करणारी अस्पृश्यता ही आजच्या प्रमाणे त्या कालांत एक समस्या होती. नामदेवांनी हरिजनांचीहि सेवा करून अस्पृश्योद्धारावरील श्रद्धा व महत्त्व जगांत पटवून दिले. सामाजिक विषमता दूर करण्याचे त्यांनीं जे प्रयत्न केले त्यापैकी हा एक प्रत्न होता.

## पंजाबांतील पट्टशिष्य

शके १२६१ च्या सुमारास पुनः नामदेव उत्तरेकडे गेले. असे जन्मसाखी व इतर पंजाबी साहित्यावरून म्हणतां येते. त्यात दिलेल्या हकीगतीवरून नामदेव हे एकटेच द्वारका, मारवाड, हरद्वार मार्गे पंजाबांत गेले होते. प्रथम ते हरद्वाराजवळ

वसलेल्या शहरानपूर. जिल्ह्यातील ज्वालापू येथे. गेले याठिकाणी एक मठवजा गुरुद्वार नामदेवांच्या स्मरणार्थ बांधलेला आहे. तेथे अमृतसर तहशिलातील भूतविंड या गावी येऊन वैष्णव धर्माचा परिचय खेडोपाडीच्या लोकाना करू लागले. त्या गांवी अडोली नावाची एक विधवा स्त्री होती. ती मोलमजुरी करून रहात असे. तिला बहोरदास नावाचा एकुलता एक मुलगा होता. तो संसारी गृहस्थ होता. त्याला अकस्मात मृत्यु आला. त्यावेळीं नामदेव घोमानला होते. बहोरदासाची बायको रडत नामदेवाकडे आली. तिनें नामदेवांचे पाय धरले. नामदेवांना तिची कींव आली. त्यांनीं बहोदरदासाला जिवंत केले व अनुग्रह दिला. तेव्हांपासून तो नामदेवांच्या सेवेत राहूं लागला आणि त्यानें 'बोहरदास' हे नांव धारण केले. 'बोहर' म्हणजे पंजाबी भाषेंत 'परत आलेले'. हाच पुढें नामदेवांच्या पंजाबातील पट्टशिष्य बोहरदास म्हणून प्रसिद्धीस आला. नामदेवांच्या घुमान येथील देवालयाची व्यवस्था अद्यापि बहोरदासाच्या वंशजाकडेच आहे. सध्यां बहोदरदासाच्या वंशातील लछमनदास मंदिराचे हक्कदार पुजारी आहेत. भूतविड अमृतसर पासून चार मैल अंतरावर असून तेथें नामदेवांच्या स्मरणार्थ गुरुद्वारा बांधलेला आहे.

भूतविंडचा निरोप घेऊन ते गुरुदासपूर जिल्ह्यांतील मरड या गांवीं गेले. रामगृह सरदारजींनीं येथे नामदेवाच्यास्मरणार्थ गुरुद्वार उभारले. प्रत्येक महिन्यांत अमावस्येला मोठा मेळावा वा यात्रा भरत असते. तेथून पुढें पाण्याचा दुष्काळ असलेल्या भट्टीवाला या गांवी नामदेवांनीं प्रयाण केले. तेथील लोकांनीं नामदेबांनीं सांगितलेल्या जागीं तलाव व एक बिहीर खणली. त्या ठिकाणीं रुचकर पाणी लागलें. नामदेवांच्या नांवानें या गांवी एक गुरुद्वार बांधले आहे. नामदेवांच्या स्मरणार्थ या तलावास "नामियाना" असे म्हणतात. येथें जल्लो व लद्धा या नांवानें दोन शिष्य नामदेवांना मिळालें. त्यापैकी जाल्लो ऊर्फ जाल्हण हा व्यवसायानें सुतार होता. पहिल्या तीर्थयात्रेंत तो नामदेवांच्या बरोबर आला होता असें पुढील अभंगचरणावरून म्हणतां येतें," निवृत्ति, ज्ञानेश्वर, जनमित्र, सोपान। सांवता, **जाल्हण** घेऊनी सरिसें ॥" तो मूळचा या भट्टीवाल गांवाचा. पंढरपूरची तो वारी करीत असे. भट्टिवाल येथे त्याचे स्मारक आहे. नामदेवाचा दुसरा शिष्य लद्धा हा धुमान जवळचा सखोवाल गांवचा खत्री होता. तो गांवांत व्यवसाय करून नामदेवांच्या शिकवणीचा प्रसार करी. नामदेवांच्या स्मरणार्थ उभारलेले एक मंदिर **गुरुद्वारा** सखोवाल खेड्यांत आजहि आहे.

———+———

# ईश्वर साक्षित्वाच्या खुणा

## निवेदक चिपळूणकर गुरुजी

**खूण पांचवी-**

मनुष्य प्राणी हा परमेश्वराच्या सर्जन शीलत्वाचा उत्कृष्ठ नमुना होय. पंचज्ञानेंद्रियें व पंचकर्मेंद्रिये ही परमेश्वराने सर्वच प्राण्यांस दिली आहेत परंतु सदसद्विवेक बुद्धि व तिचा उपयोग ह्या शक्ती त्यानें फक्त मनुष्यालाच दिलेल्या आहेत किंवा जगन्नियंत्या परमेश्वराशी कृतज्ञतेने व भक्तिभावाने वागून मनुष्यानें त्या मिळविल्या आहेत. अर्थातच परमेश्वराचें अस्तित्व मानणें व त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेणें व त्या अनुभवाची प्रामाणिकपणें आठवण ठेवणें हें मनुष्याचें कर्तव्य ठरतें. या आठवणी म्हणजेच ईश्वरसाक्षित्वाच्या खुणा होत.

सन १९५२ ची ही गोष्ट आहे. मला नियोजित नोकरी करून स्वस्थ बसवत नव्हतें. आपणही अन्य कांहीं उद्योग म्हणा किंवा जोडउद्योग म्हणा कीं, जेणें संसाराला झाला तर थोडाबहुत उपयोगच होईल, असा करावा, असें मनांत आलें. याच वेळीं दैवानें म्हणा (किंवा पुढें अनुभवलेल्या दुर्दैवानें म्हणा) एक लहानसें दुकान हातीं आलें. आपले घरांतील मंडळीस कांहीं उपयोग होईल, कोणाची तरी सोय होईल, या दृष्टीनें व जमल्यास पुढें त्याचा विकास करतां येईल, या दृष्टीनें मी तें दुकान खरेदी केलें. या गोष्टीला अर्थातच माझ्या स्वतः शिवाय व माझ्या पत्नीशिवाय अन्य कोणाचाही दुजोरा नव्हता. परंतु, " केनापि देवेन हृदि स्थितेन यथानियुक्तोऽस्मि तथा करोमि। " या न्यायानें मी हा व्यवहार केला. मी नोकरी करून शिवाय कांहीं व्यापार धंदा करतों हें समाधान अल्प काळका होईना, पण मला मिळालें.

कोणताही उद्योगधंदा म्हटला म्हणजे त्यांत जवळचा पैसा घालणे जमल्यास जरूर वाटल्यास कर्ज वगैरे करूनही पैसा मुद्दल रूपानें घालून त्यावरील फायद्याची अशा करावयाची; पण मुद्दलावर लक्ष ठेऊन अशा व्यवहारांत थोडें सबुरीनेच घ्यावें लागतें. मीही याच न्यायाने वागत होतो; परंतु ज्या लोकांनी मजकडे कांही विश्वासाने पहावे अशी मंडळी असतांना त्यांनीच मला निराश केल्यावर इतराच्या मदतीची व सबुरीची आशा करावयासच नको. येथेहि असाच व्यवहार झाला व लवकरच दुकान विकून टाकण्याखेरीज मला गत्यंतर उरले नाही.

अशा परिस्थितीत मी असतांना दुकानांन खरेदीसाठी व व्यवस्थेसाठी खर्ची घातलेला पैसा भरपाई करणारा गिऱ्हाईक व तोही लवकर मिळणे ही जरा कठीणच गोष्ट होती. पूर्वीच्या खुणांत लिहिल्याप्रमाणे श्री. बाबांच्या तसबिरीस अनन्य भावानें हात जोडणे हें चालूच असतांना एक दिवस मी बाबांना मनोमन प्रार्थना केली कीं, " बाबा, माझ्या दुकानाच्या व्यवहारातील माझी परिस्थिती तुम्ही जाणतां, तरी या खोड्यातून माझी लवकर सुटका करा. कृतज्ञता बुद्धीनें मला जें शक्य आहे ते मी करीन. " अनन्यभावाने परमेश्वरास शरण गेले असतां व " त्वमेव शरणं मम " असें म्हणून विनम्र झाल्यावर परमेश्वर लांब नाही व हेच पुन्हा एकदा माझ्या प्रत्ययाला आले.

वरीलप्रमाणें बाबांस मनोमन प्रार्थना केलेल्या पुरते दोन दिवसही झाले नव्हते, तोंच एके दिवशी सकाळी माझे एक स्नेही त्यांच्या स्नेह्याला बरोबर घेऊन मजकडे आले व म्हणाले कीं " या माझ्या स्नेह्याला एक छोटेंसें दुकान घ्यावयाचें आहे; परंतु त्यांच्या जवळ असुक असुक रकमेपेक्षां जास्त पैसे नाहींत, तुला जमण्यासारखें असल्यास पाहा व मला कळव, " असें सांगून दोघेही आल्या वाटेनें परत गेले. ही मंडळी परत गेल्यावर मी माझ्या खोलींत येऊन कृतज्ञता बुद्धीनें व भारावलेल्या मनानें श्री बाबांचे तसबिरीकडे एक टक पहात राहिलों; कारण त्या गृहस्थानें दुकानासाठीं देऊ केलेली किंमत ही मी एकंदर व्यवहारांत घातलेल्या किंमतीपेक्षां फक्त दहा रुपयानी जास्त होतीं. याचवेळी माझ्या कृतज्ञतेची कसोटी होती; कारण माझी किंमत मला मिळतां उरलेल्या ज्यादा रुपयांचे मी काय करतों याकडे जणूं कांही परमेश्वराला पाहावयाचें होतें. मी आलेल्या रकमेने ज्यांचा ऋणी होतों त्याचा अनऋणी झालों व उरलेल्या दहा रुपयांपैकीं ५ रु. शिरडी येथें ५ रु. अन्य देवस्थानाला पाठवून देवाच्या शब्दांतून मोकळा झालों.

अशा रीतीनें ईश्वरी अस्तित्वाची साक्ष पुन्हा एकदा पटली व श्रीतुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे, " जया मनीं जैसा भाव—तैसा पावे पंढरिराव " ही संतोक्ति अनुभवास आली. ईश्वरावर पूर्ण निष्ठा ठेवा म्हणजे त्याचें अस्तित्व जवळच दिसून येईल.

—+—

# आमच्या गुरुजींनीं काय सांगितलें ?

## साधकाचें मार्गदर्शन

लेखिका : सौ. लक्ष्मी पालांडे

आमचे परमपूजनीय गुरुजी श्री. प्रधानसाहेब यांचें वारंवार एकच सांगणें असे कीं, मानवदेह आपल्याला मोठ्या भाग्यानें लाभला आहे. आत्मस्वरूप समजून घेणें हा मानवी जीवनाचा आद्य हेतू आहे. मनुष्यानें त्याचें मन बुध्दि व शरीर यांच्या मायाजालांत न गुरफटतां विकारादिकांची हकालपट्टी करून सच्चिदानंदाची प्राप्ति करून घेतली पाहिजे. हा परमानंद हें आत्मसमाधान व ही चिरशांति मिळविण्यासाठीं स्थिरचित्तानें परब्रह्मस्वरूपाचें ध्यान केलें पाहिजे.



### अहंकार सुटत नाहीं

सर्व साधारणपणें आपला अनुभव असा असतो कीं, आपली सात्विक वृत्ति असून सुद्धां आपल्याला वरील-प्रकारचें ध्यान करणें साधत नाहीं. त्याचें मूळ कारण आपला अहंकार, आपली अस्मिता, आपला मीपणा. तोच ध्यानाच्या आड येतो. हा मीपणा कधीं कधीं वरवर सुटल्यासारखा वाटतो पण अंतःस्थ तो दडलेला राहातो व मनुष्याला विचारांत पाडतो, विकारवश करतो, नको तें करायला भाग पाडतो. हातून कर्म घडलें, तोंडानें नको तें बोललें गेलें कीं, त्याचे दुष्परिणाम भोगणें प्राप्त होतें व मनांत दुःख राग द्वेष उत्पन्न होऊन मन अस्थिर होतें व म्हणून एकचित्तानें ध्यान करणें साधत नाहीं.

अहंकार दुखावला जाण्याच्या भीतींत व तो दुखावला गेल्याच्या रागांत मनुष्य सर्व आयुष्य घालवितो. माझा अपमान होईल, माझें मन दुखेल, माझ्या मनाविरुद्ध

घडेल, तें मला सहन कसें होईल, ही भीति सतत त्याचा पाठपुरावा करीत असते. आपल्या गुणांची, कर्तृत्वाची कदर जगांत होत नाहीं, आपली लायकी असून आपल्यावर प्रेम केलें जात नाहीं, आपला योग्य मान ठेवला जात नाहीं, ह्या रागानें तो धुमसत असतो. सतत भीतीमुळे तो अकार्यक्षम बनतो व कर्तव्यच्युत होतो. रागाच्या आधीन होऊन तो असा कांहीं वागतो बोलतो व कृति करून जातो कीं, जें कांहीं थोडें बहुत हातून घडते तेंही विफल होतें व परिणामी तें त्याचेंच मनःस्वास्थ्य घालवायला कारणीभूत होतें.

## परमेश्वर आपली कसोटी लावतो

मान अपमान हा विचारच मनांतून काढून टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपली परीक्षा पहाण्याकरिता परमेश्वर आपल्यावर निरनिराळे प्रसंग आणतो, त्या प्रसंगी धीरानें व शांततेनें वागल्यानेंच आपण खऱ्या कसोटीला उतरूं व परमेश्वराला प्रिय होऊं. ही वृत्ति नेहमीं जागृत ठेवली तर मानापमान वाटणें कमी होईल. दुसरी गोष्ट विशेषत्वानें लक्षांत ठेवायची कीं, मानापमान सुखदुःख आधिव्याधी ह्या फक्त आपल्या पंचतत्वानें बनलेल्या यातना नश्वर देहाला होत असतात. शरीर म्हणजे आपण नव्हे, मी नव्हे. मी म्हणजे ह्या शरीराला चैतन्यमय बनविणारा अंतःस्थ कूटस्थ आत्मा. तो निरकाल अबाधित आहे. परंतु थोड्या काळासाठीं अमूक एक शरीर धारण करून ह्या जगांत वावरतो.

ज्या परिस्थितीत तें शरीर रहाते त्याचप्रमाणें त्याच्यावर कृतकर्मांचे आघात होत रहातात, हाल होतात, सुखसोहाळे होतात, मान होतो, सर्वकांहीं त्या शरीराचे होते. आत्मतत्व अशी अनंत शरीरें अनंत रूपें धारण करून विचरत असतें. आपलें सर्वस्व मानून ज्या शरीराचें आपण येवढे स्तोम माजवतो तें आपलें शरीर ह्या स्थिरचर-सृष्टीमध्ये अत्यंत कः पदार्थ वस्तूंत जमा आहे. जें कस्पटाचेही कस्पट; आज आहे तर उंद्या नाहीं असें हें क्षणभंगुर शरीर. ह्या जगाच्या अवाढव्य पसाऱ्यांत त्याची काय किंमत ? काय महत्व! तेव्हां त्या शरीराला होणारी सुखदुःखें आशानिराशा निंदास्तुति ह्याचा संपर्क ह्या शरीरांत चैतन्यरूपांत रहाणाऱ्या आत्म्याला नाहीं.

## साक्षात्कारी सद्गुरूंचें मार्गदर्शन

अनंतकोटिब्रह्मांडनायक परमात्म्याचा एक अंश तो आपला आत्मा, तो खरा मी, तो नित्य शुद्ध बुद्ध आहे हें त्याचें खरें स्वरूप जेव्हां आपल्याला आकलन होतें तेव्हा परमानंद प्राप्ति होते. ह्या स्वरूपाचें आकल व्हायला अनुभवी व ज्यांना साक्षात्कार

झाला आहे अशा सद्गुचे मार्गदर्शन अत्यंत आवश्यक आहे. ह्या मार्गांत गुरूच आपला खरा सहाय्यक आहे त्राता दाता सर्व कांहीं गुरूच ही खात्री पटली व मनामध्ये सच्चिदानंदप्राप्तीची खरी तळमळ लागली कीं परमेश्वरी योजनेनें योग्य गुरु भेटतोच भेटतो. त्याला अनन्य भावानें शरण गेलें म्हणजे तो प्रसन्न होऊन शक्तिपातक्रियेनें साधकाची कुंडलिनी म्हणजेच चित्शक्ति जागृत करतो. चित्शक्ति मनुष्याचा तमोगुण घालवून त्याला सचेत करते. त्याच्या शरीरमनबुद्धीचा कानाकोपरा स्वच्छ करते, बुद्धी प्रभावी करते, मनोमालिन्य घालविते व शरीराला जखडलेल्या व्याधी कमी करते. योग्य अयोग्य, सत्यासत्य स्पष्टपणे एखाद्या उघड्या पुस्तकाप्रमाणे आपल्यासमोर मांडून उचित मार्गावर नेऊन उभे करते. एव्हढी प्रभावी चित्च्छक्ति असूनही निव्वळ हिच्याच जोरावर साधकाला समाधान मनःशांती व पूर्णानंदप्राप्ती होत नाही. हिच्या जोडीला सच्छक्ति हवी. चिच्छक्तिनें मार्गावर उभे केलें आहे. त्या मार्गाला सत्प्रवृत्ति मनांत ठेऊन सद्वर्तन करूनच अनुसरलें पाहिजे. म्हणजे ह्याचा अर्थ असा कीं, मानवी जीवन निव्वळ विचाराधीनच नाही तर तें क्रियाप्रवण आहे. कर्तृत्ववान आहे. त्याला संसारांत, व्यवहारात, कुटुंबात, समाजात वावरायचे आहे. कांहीं कृति करून दाखवायची आहे. चिच्छक्तीच्या प्रादुर्भावानें मनोमालिन्य जाऊन सत्प्रवृत्त झालेल्या मनुष्यानें पवित्र संमयशील व त्यागी वृत्तीनें सद्वर्तन केलें तरच चिच्छक्तीच्या बळावर परमानंदप्राप्ती होते; नाहींतर सर्व साधना विफल जाते. मनांत उठलेला सद्विचारच वाचेने व्यक्त झाला पाहिजे व त्याचीच परिणति कृतींत झाली पाहिजे. तरच ती कृति योग्य ठरते.

## आपण काय सोडायचें ?

पवित्र विचार व योग्य कृति व्हायला हवी असेल तर मानापमान, रागलोभ, ईर्षा, असूया, निंदास्तुति त सुखदुःख ह्या द्वंद्वांतून सुटण्याचा मनःपूर्वक प्रयत्न हवा. तो प्रयत्न करताना दोन तत्त्वें प्रथम लक्षांत ठेवायची, एक म्हणजे, प्रत्येक घडणाऱ्या, घडलेल्या व घडत असलेल्या गोष्टीला जरूर तेवढीच किंमत, जरूर तेंच महत्त्व द्यावयाचें. दुसरें तत्त्व म्हणजे आळस सोडायचा, स्वतःला वाटणारी व्यर्थ लाज व अकारण संकोच सोडायचा.

आपण आपल्या मनाचें व्यर्थ स्तोम माजवतों व कोडकौतुक करतों तसें न करतां कोणत्याही कृतीचें योग्य मूल्यमापन करूं लागलों तर, होत आहे तें योग्यच आहे असें मनाला पटूं लागेल. मग अपमान वाटणें, मनाला दुःख होणें, त्रागा करणें, क्रोधाच्या आधीन होणें टळेल. तसेंच आपण रोजच्या जीवनांत सर्व परिणामांची जाणीव

असूनही योग्य वर्तन करण्याचा अतिशय आळस करतों. मनांत एक ठरवतों, बोलून दुसरेंच दाखवतों व करतों तिसरेंच.

## आपलें विचित्र वागणें

नियमितपणानें वागायचें ठरवून आपण वेळच्यावेळीं कामे करण्याचा अतिशय आळस करतों, आरोग्य कसें राखायचे तें जाणत असून, आरोग्य बिघडवण्यासारखेंच करतों. लिहिण्या वाचण्याचा, नवीन शिकून घेण्याचा, शिकविण्याचा, सर्वांचा आळस आजचे काम उद्यांवर ढकलण्यात आपण पटाईत. जसे आपण दुसऱ्याशीं वागूं तशी उद्यां परतफेड होतें हें नक्की ठाऊक असून, मान प्रेम व विद्यादान केल्यानें द्विगुणित होते हें पटत असून, आपण जाणूनबुजून मन मानेल तसें वागतों. दुसऱ्याला मोठेपणा देत नाही. प्रेमभावना योग्यप्रकारें व्यक्त करत नाही. मग परिणाम भोगायची वेळ आली कीं चिडतों, कुढतों, रडतों. थोडक्यांत म्हणजे आलेली संधी हातची गमावतो व मागावून पस्तावतो. पण कित्येक वेळा हा पश्चातापही आपण विशुद्ध मनाने करत नाही. आपली चूक पटूनही ती मानून घेत नाहीं. मग ती कबूल करणे व सुधारणें तर दूरच. कारण आपला अहंकार. त्यामुळे उघडपणें चूक करण्याची लाज व संकोच वाटतो यामुळें उत्तरोत्तर चुकांचें प्रमाण वाढत जाते व आपली शारीरिक, मानसिक व बौद्धिक अधोगति होते. शरीर दुर्बल होते. भीती मनाचा पगडा घेते व बुद्धि मंद होते.

ज्याची फक्त चितूच्छक्ती जागृत झाली आहे पण सतूच्छक्ती जागृत झालेली नाही· विवेक, संयम, त्याग व परोपकार ज्याला साधलेला नाही अशा साधकांचें सात्तिक वृत्ति असूनही वरील प्रकारचें वर्तन होतें. तेव्हा अहंकार, ममत्व, भय व आळस सोडून साधना केली तर सद्वर्तन अंगी बाणेल. तो साधक साधुवृत्तीनें संपूर्ण शरणागति पत्करून सद्गुरूकडून ब्रह्मविद्येची दीक्षा घेण्यास पात्र ठरेल व ह्याचि देही ह्याचि डोळा त्याला ब्रह्मानंदप्राप्ति होईल.

हा सदुपदेशाचा ठेवा आमच्या गुरूंनी आम्हाला दिला आहे. आज जरी पार्थिव देहांत राहून आमच्यांत वावरत नसले तरी हें उपदेशामृत त्यानी आम्हाला पाजले आहे. तें आमच्या रोमरोमी भिनलेलें राहो व त्याप्रमाणेच आमचे वर्तन होवो, हीच मनोमन त्यांचे चरणी प्रार्थना

---

# आत्मज्ञान,-- महत्त्व आणि प्राप्ति

## एका सत्पुरुषाचा कृपाप्रसाद

या लेखाचा थोडासा पूर्वेतिहास सांगणे जरूर आहे. ज्यांचा परिचय आमच्या वाचकांस या पूर्वीच करून देण्यांत आलेला आहे, ते पंद्रिमलाईचे श्रीरामस्वामी (मे व जून १९७०) यांचा हा लेख म्हणजे एक कृपाप्रसादच आहे. तो असाच आश्चर्यकारक मार्गाने मिळालेल्या 'श्रीराम' नामाचा महिमा' (१९७०) व एका सत्पुरुषाचा परिचय' (जून १९७०) हे दोन लेख ज्यांच्या स्मरणांत असतील त्याना या लेखाच्या माननीय लेखकाचा परिचय करून देण्याची जरूरी नाहीं.



भवान्स जर्नल या इंग्रजी पक्षिकाचे कार्यकारी संपादक श्री. एस् रामकृष्णन् हे कांही दिवसांपूर्वी मद्रासला गेले असतां सत्पुरुष श्री. रामस्वामी [पंद्रिमलाईचे] यांचा मुक्काम तेथे होता. पूर्वपरिचयामुळे त्यांच्या भेटीचा लाभ घ्यावा असें त्यानां वाटले व आपल्या मित्रासह ते त्यांच्या निवासस्थानी गेले. त्यावेळी स्वामीजी पूजा अर्चा करण्यात गुंतले होते. कांही वेळाने बाहेर येऊन त्यानी भेटीस आलेल्या ह्या मंडळीस स्वहस्ते विभूती लाऊन त्यांचें नित्याप्रमाणे स्वागत केले व कुशल विचारलें. कांही बाबतीत त्यांचा सल्ला घ्यायचा होता तो घेऊन झाल्यानंतर स्वामीजी म्हणाले, "आणखी कांही ?"

त्यावर रामकृष्णन्‌चे एक स्नेही त्यांना हात जोडून म्हणाले, "स्वामीजी आत्म-विद्या" या विषयावर भवान्स जर्नलसाठीं आपण एखादा लेख देऊ शकाल का? त्यानी विलंब न लावतां आपल्या मातृभाषेंत (तामी) एक प्रार्थनापर श्लोक आळविला. त्यानंतर कांही क्षण लोटले. बोलणें चालू होतें. इतक्यांत व्यवस्थित इंग्रजी टाईप केलेले तीन कागद स्वामीजींच्या हातांत फडफडत येऊन पडले! हें आश्चर्यकारक दृश्य, तेथें हजर असलेल्या सर्वांनी पाहिले.

आरंभीं 'श्रीरामाचा महिमा' या लेखाचा उल्लेख केला आहे. त्या लेखाचीही प्राप्ति अशाच रीतीनें झाली. स्वामिजींच्या कृपेमुळे मिळालेल्या आत्मविद्या किंवा आत्मज्ञान या लेखाचा स्वैर मराठी अनुवाद आमच्या वाचकांसाठी पुढें देण्यांत येत आहे.

जगांत वावरत असतां आपण जे कांहीं संपादन करतों त्याला विद्या किंवा ज्ञान म्हणतात. हें ज्ञान आपणास निरनिराळ्या इंद्रियांच्याद्वारें प्राप्त होत असतें. याशिवाय दुसरे शाश्वत स्वरूपाचें ज्ञान माणसानें मिळवायचें असतें; त्याला म्हणतात आत्मज्ञान किंवा आत्मविद्या. तेव्हां जीव, जगत्‌ व जीवनाचें ध्येय यासंबंधी थोडा विचार करणें जरूर आहे.

(१) जीव किंवा व्यक्तिगत आत्मा म्हणजे कोण? (२) हा जीव अस्तित्वांत आला तरी कसा? (३) ह्या जीवांचें ध्येय तरी काय किंवा या जीवाला या जीवनांत काय मिळवायचें आहे.

श्रीकृष्णानीं गीतेंत स्पष्टपणें सांगून ठेविलें आहे कीं, व्यक्तीचा आत्मा म्हणजे तो माझाच अंश आहे. याचा अर्थ असा कीं तो जो आत्मा तो अनादि कालापासून अस्तित्वांत आहे. त्याच्या अस्तित्वाचा आरंभकाल कोणाला सांगता येणार नाहीं. उपनिषदांत, जें परब्रह्म त्यापासून या आत्म्याची उत्पत्ति आहे असें वर्णन करण्यात आलें आहे. जशा पेटलेल्या अग्नीतून असंख्य ठिणग्या निर्माण होतात किंवा बाहेर फेकल्या जातात तशा प्रचंड अग्नींतून बाहेर पडलेले ते स्फुलिंग असल्यामुळें त्या अग्नीची उष्णता व प्रकाश त्या प्रत्येकांत असतो तेंच चैतन्य होय.

ज्या अग्नीपासून त्यांची निर्मिती झाली ते स्फुलिंग आपल्या जन्मस्थानापासून जसजसे दूर दूर जाऊं लागतात तस तसें त्यांचे तेज व त्यांच्यातील उष्णता कमी कमी

होत जाते. परमात्मन् जो महान अग्नी त्यापासून व्यक्ति जसजशी दूर जाते तसतसें त्याच्यांतील तें चैतन्य, देवत्वाचा तो अंश कमी कमी होत जातो असा आहे हा संसार, तुम्हाला देवत्वापासून दूर फेकणारा. त्यामुळे तुमच्या वाट्यास जें येतें तें दुःख आणि त्याचें कारण वर सांगितल्याप्रमाणे तुमची संसारात झालेली गुंतवणूक आणि तुमच्यातील तो अग्नि स्फुलिंग शेवटीं नामशेष होऊन त्याचा बनतो केवळ कोळसा !

व्यक्तिमात्राला जो दिव्यानंद भोगायला मिळायचा, त्या आत्मारामाला जो आराम मिळायचा तो अज्ञानाच्या आवरणांत गुरफटला जातो. कारण परमात्म्यापासून तो फार दूर दूर गेलेला असतो.

त्याचप्रमाणे जो अग्नि स्फुलिंग मूळ अग्निनारायणापासून दूर प्रवास करीत गेला त्यानें आपल्या त्या प्रवासाची दिशा फिरवून तो परत स्वस्थानीं येऊन परमात्म्याशीं एकरूप झाला म्हणजे त्याला पुन्हां तेज व चैतन्य प्राप्त होते. तो आत्मारामांत विलीन झाला म्हणजे त्याचा पुनर्जन्म होतो.

आपणाला जें फार आवडतें तें आपणास मिळावें, तें आपल्यापाशीं असावें असें प्रत्येक माणसाला वाटत असतें. परंतु जी वस्तु आज आवडते ती उद्यांही आवडेल असें नाहीं. कांहीं ना कांहीं कारणामुळें त्याबद्दल एक दिवस नावड उत्पन्न होते. एखाद्याला एखादा खाद्य पदार्थ फार आवडतो तो हवाहवासा वाटू लागतो, परंतु शरीरांत कांहीं रोग उत्पन्न झाला म्हणजे तोच पदार्थ दृष्टीसमोरही नको असें वाटू लागतें. सदासर्वकाळ आवडणारी हवीहवीशी वाटणारी कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे आमच्या शरीरांत वास्तव्य करून राहिलेला आत्माच होय. ज्याच्यावर सर्व भावें निर्हेतुक प्रेम करावें व ज्याचा कोणाशीं संबंध येत नाहीं असा तो आहे. तो अदृश्य असून त्याचें वास्तव्य अंतर्यामीं असतें. याचा अर्थ दूध ज्याप्रमाणे एकाद्या भांड्यांत असतें तसा मात्र तो असत नाहीं. त्याचें अस्तित्व स्वतंत्रच असतें. शरीरापासून अलिप्त राहून तो आम्हांला चेतना देत असतो. आमच्या कडून कार्य करवून घेत असतो. परंतु तो मनानें जाणतां येतो. मनाला, बुद्धीला आमच्या जाणिवेला व इतर गुणावगुणांना चालना देणारा तोच असतो; आम्ही याजगांत वावरतो व प्रवास करतो तो त्याच्या सहाय्यानें आत्म्यासंबंधी ज्ञान मिळविण्याचें जें साधन तें आपण पूर्वजन्मीं किंवा या जन्मी जीं सत्कर्में करतो किंवा आपल्या धर्मग्रंथांच्या किंवा गुरूच्या आज्ञेनुसार वागतो त्यामुळें आपण मिळविलेलें असतें. तें, साधन, किंवा तें हत्यार संपादन करावें लागतें. आत्मा

हा असा आहे कीं, ज्यावर प्रत्येकानें व सर्वांनीं अपरंपार प्रेम करावे. आपण असा हा आत्मा जाणण्याची व ओळखण्याची पराकाष्ठा केली पाहिजे. तो का ओळखायचा ? कारण तो प्रियतमय, आत्यंतिक प्रेम करण्यासारखा आहे. शरीराला जन्म व मृत्यू आहे तसा आत्म्याला नाही. तो अजरामर आहे. आत्मा हा पवित्रांत पवित्र व श्रेष्ठांत श्रेष्ठ आहे. आम्हाला नानाप्रकारचीं दुःखें होतात याचें कारण म्हणजे आत्म्यासंबंधींचें आमचें गाढ अज्ञानच होय.

आत्मज्ञान कसें मिळवितां येतें ? तें कुठून प्राप्त होतें ? तें मिळविण्याचें साधन म्हणजे सद्गुरूंचें मार्गदर्शन होय.

आमच्याठायीं अज्ञान घर करून राहिलें आहे. तें नाहींसें होऊन तेथें ज्ञानाचा प्रकाश कसा व कोणामुळें होईल ? त्यासाठीं गुरुकृपा व गुरुचे मार्गदर्शन आपण मिळविलें पाहिजे.

रोजच्यारोज अनुभव येत असूनही व ठेचाळावें लागत असूनही या सत्याची लोकांना जाणीव होत नाहीं. त्या गोष्टीची दखल घ्यावी, असें त्यांना वाटत नाहीं.

सूर्यनारायण आकारानें विस्तारानें, केवढा प्रचंड आहे परंतु आमच्या दूर दूर असलेल्या डोळ्यांना तो चिमुकला दिसतो नाही का ? व तो तसा लहान आहे असेही आपणास वाटतें. आणि शास्त्रज्ञानी शोध लावून तो दिसतो त्यापेक्षां किती तरी मोठा आहे असे प्रस्थापित केलें आहे. त्याचप्रमाणे अज्ञानाच्या आवरणांत गुरफटून गेल्यामुळें आत्म्याचें सत्य स्वरूप आम्हाला आकलन करतां आलेलें नाही. तसें पाहिलें तर आम्हांला बुद्धी व सारासार विचारशक्तीही आहे. मायेच्या आच्छादनाखाली आपण गडप झालेले आहोत. त्यामुळें जें शक्य तें अशक्य होऊन राहिले आहे. जें जाणावें ते अजाण होऊन राहिले आहे. त्यामुळें आम्ही आत्म्याची गफलत केली आहे. त्याचा संयोग आपण नश्वर शरीराशी व मनाशी करून राहिलो आहोंत. आमच्या रोजच्या जीवनांत आम्हाला आत्म्याची जाणीव पदोपदी झाली पाहिजे. ती होत नाही. ती कधीं व कोणामुळें होईल ?

ज्यांना आत्मा ओळखायचा असेल त्यानीं गुरुकृपा व संतकृपा संपादन केली पाहिजे. हेंच एकमेव व सर्वोत्तम साधन आहे. त्यांचे कृपाशीर्वाद आपण मिळविले पाहिजेत. ओम्—तत्—सत्.

# आचार्य विनोबा भावे

## व्यक्ति आणि कार्य

लेखक : प्रा. **अविनाश केळकर**, एम्. ए.

बरोबर वीस वर्षापूर्वीची [ १९४० ] हकीगत. महात्मा गांधींनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध सत्याग्रहाचा लढा पुकारला. महात्माजींनी पहिला सत्याग्रही होण्याचा बहुमान आचार्य विनोबा भावे यांना दिला. वस्तुतः महात्माजींच्या अनुयायी वर्गात पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, डॉ. राजेंद्रप्रसाद, मौलाना आझाद, आचार्य कृपलानी अशी कितीतरी ख्यातनाम माणसे होती; तथापि त्यांनी पहिल्या सत्याग्रहीचा मान दिला तो विनोबानाच ! असे कोणते सामर्थ्य विनोबाजीत होते ? याची चर्चा देशात होऊं लागली. साऱ्या जगाचे लक्ष विनोबांच्याकडे गेले. विनोबा प्रसिद्धीच्या प्रकाशात आले. " हे विनोबा आहेत तरी कोण ? " असे जो तो विचारू लागला. कारण महात्माजींच्या परिवारात किती तरी प्रसिद्ध व्यक्ति होत्या. तरी परंतु विनोबांना अशी प्रसिद्धी मिळालेली नव्हती. त्यांचे कार्य, त्यांची कीर्ति आणि त्यांचे अलौकिकत्व मर्यादित आश्रमवासियानाच ज्ञात होते ! जनतेला त्यांचे कार्य अज्ञात होते. याचे मुख्य कारण म्हणजे विनोबांचा स्वभावच मुळी प्रसिद्धि पराङ्मुख आहे. त्यांचा पिंड हाच मुळी आध्यात्मिक आहे. अलिप्त वृत्तीने जनसेवा करावी, अध्यात्मांचे चिंतन, मनन करावे हीच त्यांची त्या वेळी मनोवृत्ती होती. शिवाय त्यानी आपले आयुष्य महात्माजींच्या चरणी अर्पण केलेले होते. महात्माजी जे जे सांगतील ते ते श्रद्धेने आचरणात आणायचे, त्यांच्या कार्यात आपले स्वतःचे कार्य विलीन करायचे, ही त्यांची त्या वेळची मनीषा होती. त्यांनी निष्ठेने आणि निग्रहाने महात्माजींचे तत्त्वज्ञान आचरणात आणले. त्यामुळे महात्माजींचा संपूर्ण विश्वास त्यांनी मिळविला. महात्माजींचा पूर्ण विश्वास त्यानी संपादन केला. त्यामुळेच गांधीजींनी आपल्या 'हरिजन' पत्रांत विनोबांवर एक लेख लिहून त्यांचा परिचय जगाला करून दिला. या एकाच लेखाने विनोबाना जागतिक कीर्ति मिळाली. भारतात त्याचे नाव सर्वतोमुखी झालें.

## अथातो ब्रह्म जिज्ञासा !

आचार्य विनोबा भावे यांचे संपूर्ण नांव विनायक नरहर भावे. त्यांचा जन्म ११ सप्टेंबर १८९५ रोजी कुलाबा जिल्ह्यातील गागोदे या गावी झाला. त्यांचे वडील नरहर शंभूराव भावे हे त्यावेळच्या बडोदे संस्थानात एक सनदी नोकर होते, विनोबांच्या आईचे नाव रखुमाई. विनोबांचे आजोबा शंभुराव हे गागोद्याला राहात. त्यांचे मन संसारांत रमत नसे. त्यांच्या मनाचा कल अधात्माकडे होता. देवपूजा करावी, उपास तापास व्रतवैकल्य करावीत आणि आपला सारा वेळ देवपूजेत घालवावा अशी त्यांची वृत्ती होती. त्यांच्या गावातील कोटेश्वराच्या देवळांत ते प्रतिवर्षी अन्नदान करीत. त्या वेळी ते हरिजनानाही बोलावीत. एकदां तर त्यांनी एका मुसलमान गवयाचे गाणेंही देवळात केले. ते माणसात भेदाभेद मानीत नसत. आजोबांचा आध्यात्मिक वारसा नातवाच्या, विनोबांच्या वाट्याला आलेला आहे. त्यांच्या घरात नित्यनेमाने धार्मिक ग्रंथांचे वाचन होत असे. बालपणी विनोबांनी "भक्तिविजय" हा ग्रंथ घरातील मंडळीस वाचून दाखविला होता. शिवाय त्यांच्या घरात त्यावेळी "केसरी," "काळ," "भाला" इत्यादी त्या वेळची स्वातंत्र्यप्रेमी वृत्तपत्रे येत असत. विनोबांच्या बालमनावर या सर्वांचे संस्कार झाले.

त्यांचे प्राथमिक शिक्षण गागोद्यास झाले. लहानपणापासून त्याचा स्वभाव एकलकोंडा. कसल्यातरी विचारात ते नेहमी असत. त्यांचे आपल्या आईवर जिवापाड प्रेम होते. वयाच्या बाराव्या वर्षी आईजवळ आजन्म ब्रह्मचारी राहण्याची शपथ त्यांनी घेतली. प्राथमिक शिक्षण झाल्यावर वयाच्या पंधराव्या वर्षी पुढील शिक्षणासाठी त्यांना वडिलांकडे वडोद्याला जावे लागले. बडोद्याला विनोबा जवळ जवळ सात वर्षे होते. वडिलांच्या आग्रहामुळे ते फ्रेंच भाषा शिकले. पुढे आईच्या सूचनेवरून संस्कृत शिकले. गीतेचा परिचय वयाच्या तेराव्या वर्षीच झाला होता. त्यांतील विचाराचे आकलन त्यांना त्यावेळी झाले नव्हते. पुढे बडोद्याला गेल्यावर लो. टिळकांचा "गीतारहस्य" हा ग्रंथ वाचण्यांत आला. गीतेतील आशय कळू लागला. आईला गीता कळावी म्हणून विनोबांनी तिचा अनुवाद मराठीत केला. त्याला "गीताई" असे नाव दिले. बडोद्याला असताना विनोबांनी अभ्यास मन लावून केला. ते अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी म्हणून गणले जात. फावला वेळ ते वाचनालयात घालवीत. त्या कालात त्यांनी अखंड वाचन केले. अक्षरशः हजारो ग्रंथ वाचले. मित्रमंडळींचे एक अभ्यास मंडळ काढले. त्यात वेगवेगळया विषयांवर चर्चा होत. त्या काळांत

विनोबांनी रानांत जाऊन शिवजयंती साजरी केली. संतवाङ्मयाचे परिशीलन केले. त्यांची आठवण दांडगी. अनेक संतांचे अभंग, वचने त्यांना मुखोद्गत असत. कॉलेज-मध्ये इंटरच्या वर्गात असताना " गदर " [ बंड ] चळवळ सुरू झाली. विनोबांनी कॉलेज सोडले. त्यांचा पुस्तकी शिक्षणावर विश्वास नव्हता. त्यांनी मिळविलेली सारी प्रमाणपत्रे जाळून टाकली. आपले सारे जीवन देशसेवेत घालवायचे ठरविले. महात्मा गांधी त्यावेळी दक्षिण आफ्रिकेतील आपली सत्याग्रहाची चळवळ यशस्वी करून भारतात आले होते. त्याच वर्षी ( १९१५ ) विनोबांनी आपल्या घराचा त्याग करून आणि शिक्षणाला कायमचा रामराम ठोकून काशी गाठली. काशीला जाण्यात त्यांचा उद्देश ब्रह्म जिज्ञासा हा होता. आपल्या मित्रांचा निरोप घेताना विनोबा म्हणाले, " ब्रह्म काय आहे हे जाणून घेण्याच्या माझ्या प्रयत्नाला आता प्रारंभ होत आहे. "

काशीला असताना विनोबा अन्नछत्रांत जेवण घेत. दिवसभर संस्कृत ग्रंथांचे वाचन करीत. शास्त्री मंडळींचे वादविवाद, चर्चा होत त्यात भाग घेत. या काळात संस्कृत ग्रंथांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. त्यावर चिंतन, मनन केले. या काळा-तच त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. महात्मा गांधीनी त्या वर्षी बनारस विद्यापीठात केलेले भाषण बरेच गाजले. राजे महाराजे यांची महात्माजींनी आपल्या भाषणात कानउघाडणी केली होती. त्या भाषणाचा वृत्तांत वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाला. विनोबांनी तो वाचला आणि त्याचा परिणाम त्यांच्या मनावर झाला. त्यांनी पूर्वी बऱ्याच कविता लिहिल्या होत्या. काही निबंध लिहिले होते. हे सर्व लिखाण त्यांनी गंगार्पण केले. तसेच आपला सर्व पत्रव्यवहारही गंगेला अर्पण केला, आणि वयाच्या एकविसाव्या वर्षी ते महात्माजींच्या साबरमतीच्या आश्रमात जाऊन राहिले. आपले आयुष्य त्यांनी महात्माजीना समर्पण केले. महात्माजींच्या विचारांचा आणि तत्त्व-ज्ञानाचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला. विनोबांनी गांधीजीना पत्र लिहून आपला पुत्र म्हणून त्यांनी स्वीकार करावा अशी विनंती केली. अखेरपर्यंत त्यांचे संबंध पितापुत्राचे राहिले. विनोबा आश्रमात राहायला आल्यावर महात्माजींनी विनोबांच्या मातापित्यास एक पत्र लिहिले. त्यात त्यांनी लिहिले, " तुमचा विनोबा माझ्याजवळ आहे. इतक्या लहान वयात तुमच्या मुलाने इतकी तेजस्विता, इतके वैराग्य मिळविले आहे की तसे वैराग्य अंगी येण्यासाठी मला कित्येक वर्षे धडपडावे लागले. " महात्माजीनी विनोबांची केलेली परीक्षा किती अचूक होती !

## आत्मा अमर आहे !

साबरमतीच्या आश्रमात राहायला गेल्यावर लवकरच विनोबांची प्रकृती बिघडली. गुरुजींच्या (महात्माजी ) सल्ल्यानुसार एक वर्ष हवा पालटण्यासाठी त्यांनी वाईला जाण्याचे ठरविले. वाईला त्यांचे घर होतेच. त्या एक वर्षाच्या अवधीत त्यांनी केवढे प्रचंड वाचन केले. ? केवढा जबरा व्यासंग केला ? विनोबांचा स्वभाव निग्रही आहे. एखाद्या विषयाला हात घातला की ते त्याच्या मुळापर्यंत जातात. त्यावर सखोल चिंतन करतात त्यांतून त्यांचे विचार निश्चित बनतात. त्यांचे खास तत्त्वज्ञान बनते. वाईच्या सुप्रसिद्ध प्राज्ञ पाठशाळेचे त्यावेळी केवलानंद सरस्वती (नारायण शास्त्री मराठे ) हे प्रमुख आचार्य होते. त्यांच्या सारख्या व्युत्पन्न पंडिताजवळ विनोबा शांकरभाष्य शिकले. ब्रह्मसूत्रांचा त्यानी अभ्यास केला. गीता, उपनिषदे, मनुस्मृती, पातंजल योगदर्शन, याज्ञवल्क्य स्मृती यांचा सखोल अभ्यास केला. दासबोध आदी संत साहित्य अभ्यासले. गीतेवर स्वतः प्रवचने दिली. गीतेचा वर्ग चालविला. स्वतः पायी महाराष्ट्राचा दौरा काढला. स्वतःच्या देहाला खूप देहदंडना केली. कधी उपवास कर तर कधी मोजके अन्न घेऊन ते एकवस्त्रानिशी पावसाळ्यात नदीतिरावर उघड्यावर झोपत. उन्हातान्हात पायी फिरत. बौद्धिक आणि शारीरिक अशा दोन्ही क्षेत्रात त्यांनी तपश्चर्या आरंभली. विविध प्रयोग करून बौद्धिक आणि आत्मिक सामर्थ्य संपादन केले. मनोनिग्रहाचे विविध प्रयोग केले.

पुन्हा साबरमतीच्या आश्रमात गेल्यावर त्यांनी महात्माजींच्या बरोबर सर्व प्रकारची कामे केली. दळण दळले. सूत काताई तर ते नेहमीच करीत. बौद्धिक वर्ग चालविले. शौचकूप साफ केले. महारोग्यांची सेवा केली. हरिजनांच्या उद्धारासाठी अनेक प्रकारची कामे हाती घेतली. वृत्तपत्रातून लेखन केले. प्रवचने केली बरेचसे आत्मचिंतन केले. त्यांचा पिंड हा मुळातला अध्यात्मिक आहे. एकांतात चिन्तन करणे त्यांना लावडते. त्यांचा मनोनिग्रह जबरा आहे. एके दिवशी साबरमती नदीवर ते स्नानाला गेले त्या वेळची घटना आहे. नदीच्या प्रवाहात ते गटांगळ्या खाऊ लागले. आजूबाजूच्या लोकांनी आरडा ओरड सुरू केली. परंतु विनोबांनी काय केले ? त्यांनी ओरडून लोकांना सांगितले, " बापूंना माझे प्रणाम सांगा.-विनोबा गटांगळ्या खात गेला असे त्यांना कळवा आणि त्यांना सांगा--आत्मा अमर आहे ! " गीतेमध्ये स्थितप्रज्ञ पुरुषाची लक्षणे सांगितली आहेत ती सारी लक्षणे विनोबात आपल्याला दिसतात. इतक्या लहान वयात विनोबांनी हे आलौकिक आणि असामान्य सामर्थ्य

कसे मिळविले ? स्वतःच्या प्रखर निष्ठेने आणि अखंड मनोनिग्रहाने त्यांनी ही अलौकिक शक्ति संपादन केली.

महात्माजी ह्यात असताना त्यांनी त्यांच्या प्रत्येक कार्यात सावलीप्रमाणे सोबत केली. निष्ठेने त्यांचे तत्त्वज्ञान आचरणात आणले. त्यांच्या प्रत्येक कार्यात सहाय्य केले. परंतु त्यांचे कार्य फार थोड्या, मोजक्या व्यक्तीतनाच माहीत होते. त्याची फारशी प्रसिध्दी झालेली नव्हती. त्यांची खरीखुरी प्रसिध्दी झाली ती महात्माजींच्या निधनानंतरच होय. महात्माजीच्या निर्याणानंतर त्यांचे बहुतेक अनुयायी सत्ता स्पर्धेच्या आखाड्यात उतरले. मोठमोठे सन्मान आणि सत्तेची स्थाने त्यांनी मिळविली. परंतु महात्माजींच्या कार्याचा वारसा पुढे चालविला तो एकट्या विनोबानीच ! कोणत्याही प्रकारची अपेक्षा न बाळगता, कोणताही मानसन्मान न स्वीकारता !

## भूदानाचे तत्त्वज्ञान !

महात्माजींच्या निधनानंतर सर्वोदय समाज आणि सर्वसेवा-संघ अशा दोन अभिनव संस्था स्थापन करण्यात आल्या. गांधीजींच्या विचारातील क्रांतिकारक आशय साकार करण्यासाठी सुरु झालेल्या या दोन संस्था० सर्वांनी वर्षांकाठी एकत्र जमायचे. प्रेमाने विचार विनिमय करायचा आणि आपापल्या क्षेत्रात जाऊन प्रयोग आणि चिंतन करीत कार्य करीत राहायचे, हा या सर्वोदयी मण्डळीचा उद्देश. स्वातंत्र्यानंतर निर्वासितांच्या पुनर्वसनाचा बिकट प्रश्न निघाला. विनोबांनी आपले लक्ष त्या कार्याकडे वळविले. पाकिस्तानातून भारतात आलेल्या निर्वासितासाठी प्रथम पंजाब सरकारने जमिनी देण्याचे ठरविले. परंतु पाकिस्तानात ज्यांच्या जमिनी होत्या त्यांनाच त्या मिळणार होत्या. विनोबानी त्याला विरोध केला. जमीन मालक असो की गरीब मजूर असो प्रत्येकाला जमीन द्यावी असे विनोबांनी सुचविले. पुढे पंजाब सरकारने ही योजना अशक्य असल्याचे सांगितले. विनोबा त्यामुळे चिंतन करू लागले. गरीबाना, मजुराना —हरिजनाना जमीन कशी मिळणार? त्यांचे दैन्य दूर कसे होणार? यांतूनच त्यांना नवा मार्ग सुचला. त्या वेळी ते हैद्राबादच्या दौऱ्यावर होते. निजामी राजवट संपल्यावर तेथील जनतेत क्षोभ उसळला होता. त्या जनतेची समजूत घालावी, त्यांच्यातील सूडाची आग शमवावी आणि त्यांना स्नेह, सौहार्दाची शिकवण द्यावी यासाठी लिनोबांनी हैद्राबादेत पदयात्रा काढली. १५ एप्रिल १९५१ या दिवसाची हकीगत. तो दिवस रामनवमीचा होता. प्रार्थनेच्या प्रसंगी प्रचंड जनसमुदाय जमला होता. विनोबांनी आपल्या प्रवचनात दुसऱ्या दिवसापासून तेलंगणाच्या दिशेने पदयात्रा काढण्याचा

निर्णय जाहीर केला. आरण तेथे एक शांतिसैनिक या नात्याने जात आहोत असे जाहीर केले. या पदयात्रेच्या तिसऱ्या दिवशी त्यांचा मुक्काम नालगोंडा जिल्ह्यांतील पोचमपल्ली या खेडेगावात होता. त्या दिवसाच्या प्रवचनाच्या वेळी त्यांनी अंतर्गत यादवी युद्धापासून उद्भवणाऱ्या हालअपेष्टा संकटे आणि दुःखे टाळायची असतील तर देशात शांतता राखणे किती महत्त्वाचे आहे हे स्पष्ट केले. तसेच आर्थिक आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी सर्वांनी भगीरथ प्रयत्न करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले. त्यांच्या भाषणानंतर त्या गावातील एक हरिजन पुढारी उभा राहिला. त्याने आपल्या मंडळींना जमीन मिळाली तर त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटेल असे सांगितले. विनोबांनी त्या सभेतच त्या हरिजनाना जमीन देण्याचे गावकऱ्यांना आवाहन केले. श्रीरामचंद्र रेड्डी या नावाच्या जमीनदाराने स्वतःच्या चारशे एकर जमिनीपैकी शंभर एकर जमीन भूदान देण्याचे जाहीर केले. विनोबांनी ती जमीन हरिजनांच्या चाळीस कुटुंबांत वाटून दिली. त्या दिवशी भूदानाची सुरुवात झाली. विनोबांची परमेश्वरावर नितांत श्रद्धा आहे. प्रत्येक माणसाच्या हृदयांत परमेश्वराचा अंश आहे यावर त्यांचा विश्वास आहे. आपल्या-जवळ जी संपत्ती आहे त्यांतील थोडा भाग आपण गरजू माणसाला द्यावा ही भारतीय संस्कृतीची शिकवण आहे. भूदान चळवळीची स्फूर्ती प्रत्यक्ष ईश्वरानेच आपल्याला दिली आहे अशी विनोबांची भावना आहे. प्रत्येक माणसाच्या हृदयस्थ परमेश्वराला आळविले तर तो जरूर प्रसन्न होतो अशी त्यांना बालपणापासूत शिकवण मिळालेली आहे. माणसातील चांगुलपणावर त्यांची नितांत श्रद्धा आहे. त्या चांगुलपणाला आवाहन करून जमीनदारांच्या मनात गरीबांबद्दल करुणा जागृत करणे आणि स्वेच्छेने भूदान यज्ञात आपल्या जमिनीचा काही भाग अर्पण करायला भाग पाडणे यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. अहिंसेच्या मार्गाने भूमिहीनाना न्याय मिळाला नाही तर तो प्राप्त करून घेण्यासाठी हिंसेचा वा द्वेषाचा मार्ग अवलंबिल्याशिवाय ते राहाणार नाहीत याची त्यांना खात्री पटली. समाजातील आर्थिक विषमता दूर करण्यासाठी, पददलिताना न्याय मिळवून देण्यासाठी भूदान यज्ञाची चळवळ सुरू केली. प्रत्येक दिवशी ते आपल्या प्रार्थनेच्या प्रवचनात जमीनदाराना आवाहन करू लागले. कधी प्रेमाने तर कधी मानवतेला आवाहन करून त्यांनी जमीनदारांचे हृदय परिवर्तन केले. त्यांच्यातील माणुसकी जागृत केली. स्वतः अखंड पदयात्रा काढली. अनेक कार्यकर्ते त्यांना मिळाले. जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या थोर नेत्याने भूदानाला स्वतःचे जीवन अर्पण केले आहे. शेकडो कार्यकर्त्यांनी विनोबाना साथ दिली. अशा प्रकारे विनोबानी

लाखो एकर जमिन मिळविली. त्यांचे वाटप केले. भूदानातून ग्रामदानाची कल्पना निघाली. साऱ्या जगाचे लक्ष या अभिनव प्रयोगाकडे लागले आहे. जे कार्य सरकारला करता आले नाही ते या आधुनिक संताने एकट्याने करून दाखविले आहे.

## विनोबा ! एक आधुनिक संत !

आपल्या देशात आजवर अनेक संत होऊन गेले. त्या सर्वांनी प्रेमाची आणि समानतेची शिकवण दिली. या संतांचा वारसा आज विनोबा चालवीत आहेत. माणसामाणसातील भेद त्यांना पसंत नाही, माणसातील आर्थिक आणि सामाजिक विषमता त्यांना मान्य नाही. माणसाने माणूस म्हणून इतराकडे पाहावे ही त्यांची शिकवण आहे. केवळ भारतीयांचीच नव्हे तर अखिल मानवजातीच्या कल्याणाची त्यांना चिंता लागली आहे. आजच्या विज्ञान युगातही मानवी जीवनाची उभारणी आध्यात्मिक पायावर करण्याची एक नवीन परंपरा गांधीजी आणि त्यांचे शिष्य विनोबा यांनी निर्माण केली आहे. गांधिवादाचे ते खरेखुरे वारसदार आहेत. महात्मा गांधींची शिकवण, त्यांचे विचार आणि त्यांचे तत्त्वज्ञान यांचे संपूर्ण पालन कोणी केले असेल तर तें विनोबानीच ! आजवर भारतीय संतांनी अनेक चमत्कार करून दाखविल्याचे आपण वाचतो किंवा ऐकतो. भूदान हा असाच एक अभिनव चमत्कार त्यांनी तुमच्या आमच्या डोळयांसमोर करून दाखविला आहे. आपल्या थोर ऋषिमुनींची परंपरा त्यांनी चालविली आहे.

विनोबा हे मानवतेचे उपासक आहेत. थोर संत आहेत. तितकेच ते एक विद्वान आणि विचारवंत आहेत. त्यांना अनेक भाषा येतात. भारतातील अनेक भाषा त्यांनी आत्मसात केलेल्या आहेत. वेद, उपनिषदे, गीता वा इतर धार्मिक ग्रथांचे त्यांनी सखोल अध्ययन केले आहे. संस्कृत भाषेचे ते पंडित आहेत. कुराणाचा अभ्यास करण्यासाठी ते अरेबिक शिकले. भूदानाच्या निमित्ताने ते ज्या ज्या प्रांतात गेले तेथील भाषा त्यांनी आत्मसात केली. अध्यात्माचे त्यांचे चिंतन खोलवर आहे. गीतेवरील त्यांची प्रवचने त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेची साक्ष देतात. त्यांची अनेक पुस्तके आहेत. त्यांच्या लेखनातून, त्यांच्या प्रवचनातून त्याचे तत्त्वज्ञान आणि त्यांची जीवन विषयक भूमिका आपल्याला कळते. या सर्वातून आपल्याला दर्शन घडते ते एका निर्भीड पण द्रष्ट्या विचारवंताचे. मानवी जीवनाचा सर्वांगीण आणि सखोल विचार त्यांनी केलेला आहे. ते एक स्वतंत्र प्रज्ञेचे थोर विचारवंत आहेत. त्यांचे ग्रंथ अभ्यासणे आवश्यक आहे.

# कांही मननीय व आचरणीय

## संसारी व व्यवहारिकांसाठीं

**प्रश्नः**— खरें सौंदर्य कुठें पहायला मिळेल ?

**उत्तरः**— जेथे सदाचार, शील व सद्गुणांचें वास्तव्य असतें, त्याठिकाणीं.

**प्र.**— जिव्हेचें सौंदर्य कशांत असतें ?

**उ.**— सत्य तेंच बोलण्यात.

**प्र.**— मौल्यवान् व दैदीप्यमान रत्नाप्रमाणें दुर्मिळ असें या जगांत काय आहे ?

**उ.**—( १ ) एखाद्याला कांहीं देणगी देऊन त्याची गोड शब्दांत बोळवण करणें, ( २ ) ज्ञानाचा साठा जवळ परिपूर्ण असूनही अहंकाराचा स्पर्श न होणें, ( ३ ) अंगीं शौर्य असूनही त्याची दयेशी सांगड घातली जाणें, ( ४ ) जवळ संपत्ति असून जरूर तेव्हां तिचा त्याग करण्याची बुद्धि होणें.

**प्र.**— दया करण्यालायक कोण ?

**उ.**— आप्पलपोटेपणा व कंजूषपणा.

**प्र.**— या जगांत प्रशंसनीय गुण कोणता ?

**उ.**— इतरेजनाशीं दयाधर्मानें वागणें.

**प्र.**— शहाणी माणसें कोणाचें गुणगान करतात ?

**उ.**— जे स्वभावतःच नम्र आहेत त्यांचें.

**प्र.**— या जगाला कोण जिंकूं शकेल ?

**उ.**— जन्मास येऊन सतत सत्कार्यें करणारा व नम्रभावानें गोड बोलणारा.

**प्र.**— कोणावर संकटें येऊं शकणार नाहीत ?

**उ.**— जो वडील माणसांच्या शब्दाला मान देतो, त्यांच्या सांगण्याप्रमाणें वागतो आणि जो सर्वांशीं नम्र असतो.

प्र.—रहायला सवरायला चांगली जागा कोणती ?

उ.—जेथें सज्जनांचें वास्तव्य आहे व जें स्थान बनारसप्रमाणें पुण्यपावन झालेलें आहे.

प्र.—दारिद्र्यापासून व दुःखापासून माणसाची सुटका कोण बरं करू शकेल ?

उ.—आज्ञाधारक, कर्तव्यदक्ष पत्नी व सदासर्वकाळ टिकून रहाणारी म्हणजे प्रामाणिकपणें संपादन केलेली संपदा.

प्र.—ज्यानें आपलें जीवन सदासर्वकाळ दुःखांत घालवावें असा कोण ?

उ.—ज्याच्याजवळ देतां येण्याजोगें पुष्कळ असूनही जो देत नाहीं ज्याला देण्याची इच्छा होत नाही तो.

प्र.—रामचंद्रापेक्षांही शूरवीर कोणाला म्हणतां येईल ?

उ.—जो मदनाच्या बाणांनीं रतिभरही विद्ध होत नाहीं तो !

प्र.—दिवसा व रात्री आम्हीं चिंतन कशाचें करावें ?

उ.—भगवंताच्या चरण कमलांचें. तसेंच हें जग आणि या जगांत माझें स्थान मला कसें शोभिवंत करतां येईल याचें.

प्र.—सच्चरित किंवा सद्गुणी माणसानें कशाचा उच्चार करूं नये?

उ.—असत्याचा व दुसऱ्यांतील दोषांचा.

प्र.—आम्हीं या जगांत येऊन मिळवावें असें काय बरं आहे ?

उ.—ज्ञान, संपत्ति, शौर्य, कीर्ति आणि सत्कृत्यें.

प्र.—ज्याच्यापायीं सर्व सद्गुणांचा सत्यनाश होतो असें काय आहे ?

उ.—कंजूषपणा. कोणाला कांहींही न देण्याची वृत्ति.

प्र.—आमचा खरा शत्रु कोण ?

उ.—हावरटपणा.

प्र.—या जगांत माणसाने काळजीपूर्वक वागावें तें कोणाच्या बाबतीत ?

उ.—जो राजाच्या सेवेंत आहे त्यानें राजाच्या बाबतींत दक्षतेने वागावें.

प्र.—आम्ही कोणत्या गोष्टीचें रक्षण करणें जरूर आहे ?

उ.—कीर्ति, पावित्र्य व स्वतःसंबंधीचें ज्ञान. स्व-स्वरूपज्ञान.

प्र.—सर्वांची माता कोणाला म्हणता येईल.

उ.—गायत्री.

प्र.—मृत्यूचे दैवत कोणतें ?

उ.—बेदरकारपणा !

प्र.—विषाचें वास्तव्य कुठें असतें ?

उ.—दुर्गुणी माणसांत.

प्र.—भीति कशापायीं निर्माण होते ?

उ.—संपत्तीमुळें, संपत्ती केवळ जवळ करण्याच्या हव्यासामुळें.

प्र.—संपादन करणें जरूर परंतु जें संपादन करणें जमत नाही असें काय ?

उ.—भगवंताची भक्ती.

प्र.—पाप कशाला म्हणायचें ?

उ.—इतरांशीं क्रूरपणें वागणें

प्र.—एखाद्याला जें कांहीं मिळवायचें आहे तें त्याला कशाच्या बळावर मिळवितां येईल ?

उ.—तपस्येच्या बळावर.

प्र.—सुखसमाधानाचा मूलभूत मंत्र कोणता ?

उ.—सतत सत्कृत्यें करीत रहाणें.

प्र.—दुःखाचें मूलभूत कारण कोणतें ?

उ.—पापकर्म.

प्र.—सर्वोच्च पदाला, सद्गतीला कोण जाऊन पोहोंचतो ?

उ.—जो भक्तिभावानें भगवंताला भजतो तो.

# ‘मज विश्वंभर बोलवितो’

## तुकोबांचा एक अभंग

मानसिक शुध्दि व संशोधन या दृष्टीनें संत तुकारामाच्या अभंगांचें महत्त्व असामान्य आहे. कारण ते अनुभवाचे व अंतःप्रेरणेनें लोककल्याणासाठीं बाहेर पडलेले उद्गार आहेत.

या अभंगाचें महात्म्य गातांना संत विनोबा म्हणतात—“ मानसिक संशोधनाच्या कामीं तुकोबांनी मला पुष्कळ मदत केली आहे. माझ्या आईच्या मधुर कंठांतून तुकारामाचे अभंग मी ऐकले आहेत. त्यांच्या स्मरणानेंही आज माझे डोळे ओले होतात.”

आणि हें लक्षांत बाळगून विनोबांनीं केलेलें तुकोबारायांच्या अभंगांचें पुढील स्पष्टीकरण मन लावून वाचण्यासारखें आहे.

### हा देवाचा प्रसाद आहे

**कृपेचीं उत्तरें देवाचा प्रसाद। आनंदें आनंद वाढवावा ॥ १ ॥**
**बहुतांच्या भाग्यें लागलें जहाज। येथें आतां काज लवलाही ॥ २ ॥**
**अलभ्य तें आलें दारावरी फुका। येथें आतां चुका न पाहिजे ॥ ३ ॥**
**तुका म्हणे जिव्हा-श्रवणाच्या द्वारें। माप भरा बरें शिगेवरी ॥ ४ ॥**

तुकाराम महाराज म्हणतात, “ हीं जीं मी वचनें बोलत आहें तीं माझ्या पदरचीं नाहींत. तीं संतांच्या कृपेनें प्राप्त झालेलीं आहेत. तो देवाचा प्रसाद आहे. त्या वचनांचें जो श्रवण पठण करील तो मौजेन ब्रह्मानंद गांठणार आहे. बहुजन-समाजाची थोर पुण्याई म्हणून हें देवाच्या घरच्या मालानें भरलेलें जहाज आज बंदराला लागलें आहे. म्हणून शक्य तितक्या लवकर आतां आपलें काम घ्या. अलभ्य वस्तु दारीं चालून आली आणि फुकट मिळते आहे. अशा स्थितींत कोणी गैरसावधपणानें किंवा आळसानें चूक करूं नका. ही वचनें स्वतः श्रवण करा, लोकांना ऐकवा. शिगेला लागेपर्यंत माप भरभरून माल घ्या. संकोच राखूं नका.”

" बहुजनसमाजाच्या कल्याणासाठी देवानें माझ्याकडून वचनें बोलविली आहेत, म्हणून सर्वांनीं तीं खुशाल लुटावीं, " असें ह्या अभंगांत महाराजांनीं जाहीर केलें आहे.

( १ ) कृपेचीं उत्तरें—

**कृपेचे सागर हेचि साधुजन। तिहीं कृपादान केलें मज ॥**
**आधारें वदलों प्रसादाची वाणी। उच्छिष्ट सेवनीं तुमचिया ॥**
**संतांचीं उच्छिष्टें बोलतों उत्तरें। काय म्यां पामरें जाणावें हें ॥**

— तुकाराम

**किंबहुना तुमचें केलें। धर्म-कीर्तन हें सिद्धी गेलें।**
**एथ माझें जी उरलें। पाइकपण ॥**—ज्ञानदेव.

( २ ) देवाचा प्रसाद—

**देवाच्या प्रसादें करा रे भोजन।**
**व्हाल कोण कोण अधिकारी ते ॥**
**फोडिलें भांडार धन्याचा हा माल।**
**मी तंव हमाल भारवाही ॥**

" आपुलिया बळें नाहीं मी बोलत " हा अभंग प्रसिद्धच आहे. 'माझ्याकडून देव बोलवून घेत आहे' ही जाणीव महाराजांच्या अनेक अभंगांत त्यांनी प्रगट केली आहे. उदाहरणार्थ खालीं एकच अभंग देतों:

**करितों कवित्व म्हणाल हें कोणी।**
**नव्हे माझी वाणी पदरींची ॥ १ ॥**
**माझिये युक्तीचा नव्हे हा प्रकार।**
**मज विश्वंभर बोलवितो ॥ २ ॥**
**काय मी पामर जाणें अर्थ-भेद।**
**वदवी गोविंद तेंचि वदें ॥ ३ ॥**
**निमित्त मापासी बैसविलों आहें।**
**मी तों कांहीं नव्हें स्वामि-सत्ता ॥ ४ ॥**
**तुका म्हणे आहे पाईकचि खरा।**
**वागवितों मुद्रा नामाची हे ॥ ५ ॥**

( ३ ) श्रवणानें मोक्षाची सुलभता—

**जरी मंत्रें चि वैरी मरे । तरी वायां कां बांधावे कटारे ।**
**रोग जाय दुधें साखरें । तरी निंब कां पियावा ॥**
**तैसा मनाचा मार न करितां । इंद्रियां दुःख न देतां ।**
**एथ मोक्ष असे आइता । श्रवणाचि माजीं** ॥—ज्ञानदेव

( ४ ) बहुजनसमाजासाठीं तुकाराम महाराजांचा जीव कळवळे. त्यांच्यासाठी हीं वचनें देव माझ्याकडून बोलवीत आहे असें त्यांस वाटे. सर्वांना घेऊन पुढें जावें अशी त्यांची वृत्ति होती. म्हणूनच

**अर्भकाचेसाठी । पंतें हातीं धरिली पाटी ॥ १ ॥**
**तैसे संत जगीं । क्रिया करूनि दाविती अंगीं ॥ २ ॥**
**बाळकाचे चाली । माता जाणून पाउल घाली ॥ ३ ॥**
**तुका म्हणे नाव । जनासाठीं उदकीं ठाव ॥ ४ ॥**

ह्या त्यांच्याच अभंगाप्रमाणें त्यांनी अर्भकासाठीं—बहुजनसमाजा**साठीं**—हातांत 'पाटी धरली होती.

**या रे या रे लहान थोर । याती भलते नारी नर ॥**

अशी ते सर्वांना हांक मारीत.

**एकमेकां करूं साह्य । अवघे धरूं सुपंथ ॥**

हा त्यांचा बाणा होता. 'देवाचा प्रसाद' सर्वांना मिळालाच पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. आणि खरोखरच देवाचा प्रसाद त्यांनीं सर्वांकडून लुटविला यांत शंका नाहीं.

**अवधियापुरतें वोसंडलें पात्र ।**
**अधिकार सर्वत्र आहे तेथें ॥**

( ५ ) अलभ्य वस्तु, दारावर आली. आणि फुकट मिळते असा तिहेरी लाभ आहे. म्हणून भरपूर लुटा. 'अलभ्य वस्तु' म्हणजे पारमार्थिक ज्ञान अथवा ब्रह्मविद्या. 'दारावर' आली म्हणजे मराठी भाषेंत प्रगट झाली. आणि फुकट मिळते म्हणजे मराठी भाषा तर खरीच पण तीहि कुणब्याची मराठी, समजण्याला मुळींच परिश्रम पडत नाहींत.

# मुंडकोपनिषद आणि विज्ञान

## लेखांक तिसरा

( लेखक : शाहीर पा. द. खाडिलकर )
एम्. ए. बी. टी.

मुंडकोपनिषदाच्या द्वितीय मुंडकातील प्रथम खंडांत अखिल विश्वाची उभारणी कशी झाली आहे. तें सांगितलें आहे; तसेंच ब्रह्मांडाचा उपसंहार ही कशांत होतो म्हणजे लय कशांत होतो, त्याचेंही वर्णन आलें आहे. अक्षरांतूनच विश्वाची उत्पत्ति आणि त्याच अक्षरांत परत लय होतो. उत्पत्ति व लय या क्रिया व्यक्त ब्रह्मस्वरूपांत सतत होतच असतात.

### ह्याविषयीं एक पद्यः—(स्वकृत)

अंगिरस शौनकास सांगतातः—

**उभारणी कशि झालि जगाची आता तुज सांगिन ।**
**गुरु बोलले सच्छिष्याला तेंच आतां सांगिन ॥ १ ॥**
**असंख्य ठिणग्या जशा उसळती एका अग्नींतुन ।**
**जीवात्मे हे तसे प्रगटले एका ब्रह्मांतुन ॥ २ ॥**
**सबाह्याभ्यंतरिं भरलेला पुरुष असे उत्तम ।**
**जिथें मनाची गती न चाले दूर करी भवतम ॥ ३ ॥**
**चराचरांची प्राणमनांची उत्पत्ती त्यांतुन ।**
**समुद्र पर्वत पशुपक्षीही झाले ब्रह्मांतुन ॥ ४ ॥**
**तत्त्व असें हें गहन जगाचें जाणिल जो निर्गुण ।**
**जगांत जीवन्मुक्त खरा, त्या पांडुरंग शरण ॥ ५ ॥**

द्वितीय खंडांतील पहिल्याच मंत्रांत जगाची उत्पत्ति आणि लय सूत्ररूपानें सांगितली आहेत. तो मंत्र असा :—

**यथा सुदीप्तात्पावकात् विस्फुलिंगाः सहस्रशः प्रभवन्ते सरूपाः ।**
**तथाक्षराद् विविधाः सोम्य भावाः प्रजायन्ते तत्र चैवापियन्ति ।।**

**अर्थः**—हे वत्सा, ज्या प्रमाणें धडकलेल्या अग्नीतून अनंत ठिणग्या उसळून बाहेर पडतात त्या प्रमाणें अविनाशी परमेश्वरापासून अनेक प्रकारचे पदार्थ उत्पन्न होतात आणि त्याच्याच ठिकाणीं लय पावतात, हेच खरें आहे !"

यानंतर येणाऱ्या नवव्या मंत्राच्या अखेर सृष्टीची क्रमशः उभारणी सांगितलेली आहे.

ह्या अमूर्त अशा सर्वत्र भरलेल्या पुरुषापासून प्राण, मन, सर्व इंद्रियें, आकाश, वायु, तेज, पृथ्वी आणि जल ही तत्त्वे उत्पन्न होतात. ह्या पुरुषाच्या मूर्धस्थानापासून अग्नि ( तेज ), तेजापासून सूर्य, सूर्यापासून चंद्र, चंद्रापासून पर्जन्य त्यापासून पृथ्वीवर वनस्पति, प्राणी आणि स्त्रीपुरुषापासून प्रजा उत्पन्न होतात.

ह्या विराट पुरुषापासूनच ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद, दीक्षा ( व्रतग्रहण ) सर्वयज्ञ, ऋतु, दक्षिणा, यज्ञकर्ता, आणि जेथें चंद्र व सूर्य आहेत ते लोक उत्पन्न झाले आहेत. नंतर त्या विराट पुरुषापासूनच देव, गणदेव, मनुष्यप्राणी, पशु, पक्षी, प्राणादि-वायु, तांदूळ वगैरे धान्ये व्रताचरणें, आस्तिक्यबुद्धि, सत्यनिष्ठा आणि विधिनिषेध, दर्शनशास्त्र निर्माण झाले.

त्या विराटपुरुषापासूनच सात अवयव ( मस्तकावर असलेले ५—२ डोळे, २ कान, २ नाकपुड्या, १ तोंड ) प्रगट झाले, त्याच प्रमाणें सात शक्ति, सात, समिधा, सात अवयवांचे विषय सात होम व सात प्राण ही सात स्थानें उत्पन्न झालीं. त्यानंतर समुद्र, पर्वत, नद्या, वनस्पति, रस, उत्पन्न होतात. ह्या रसांच्या योगानें हा जीवात्मा जड द्रव्याशी संघटित होऊन राहतो.

शेवटी दहाव्या मंत्रांत असें सांगितलें आहे कीं हे अविनाशी तत्त्व जो ओळखतो तोच अज्ञानाची गांठ सोडवितो.

द्वितीय मुंडकाच्या दुसऱ्या खंडांत क्षेत्रज्ञाचा म्हणजे जीवात्म्याचा विचार केला आहे. एकूण १२ मंत्र आहेत. जें ब्रह्मांडीं तेंच पिंडीं आहे. अक्षरब्रह्मापासून जशी जडसृष्टी निर्माण झाली तसेच जीवात्मे ही त्यांतूनच प्रगट झाले. हा जीवात्मा शरीरांत कोठें वास करतो त्याचें वर्णन १० व्या मंत्रांत आलें आहे.

**मंत्र १० वाः—**

**हिरण्मये परे कोशे विरजं ब्रह्म निष्कलम् ।**
**तच्छुभ्रं ज्योतिषां ज्योतिस्तद् यदात्मविदो विदुः ॥**

**अर्थः**--तें ब्रह्मतत्त्व निर्दोष, निरवय व शुध्द तेजांचें तेज असून तें तेजोमय व श्रेष्ठ अशा हृत्कोशामध्यें असतें.

११ व्या व १२ व्या मंत्रांत परमात्म्याचें वर्णन आलेले आहे! ब्रह्म सर्वत्र भरलेलें आहे आणि जीव हा त्याचाच अंश आहे. असा निष्कर्ष काढलेला आहे.

मुंडकोपनिषदाच्या तिसऱ्या मुंडकांत जीव-शिव-परमात्मा या तीन प्रकारच्या आत्मदर्शनाचा समन्वय केला आहे. तृतीय मुंडकाच्या प्रथम खंडांत जीव-शिवांचे शरीरांतील वास्तव्य व ज्ञानप्राप्तीनंतर त्यांचें ऐक्य याचें वर्णन आले आहे. शिवाय शुद्ध स्वरूप म्हणजेच हे होय. जीव हा मायावाच्छिन्न असतो आणि हळू हळू चिंतनाने तो शुद्ध होत जातो जीव हा सुखदुःखाचे अनुभव घेत असतो पण शिव हा सर्व उपाधीच्या बाहेर केवळ द्रष्टा या रूपात असतो.

जीवशिवांचे ऐक्य जाणणें म्हणजे आपण परमात्म-स्वरूप आहोंत हें समजणें आहे. त्या बाबतीत तुकारामांचा एक अभंग महत्त्वाचा आहे, तो असा.--

**अभंग**

**तुज मज ऐसी परी। जैसे तरंग सागरीं ॥ १ ॥**
**दोही माजी एक जाणा। विठ्ठल पंढरीचा राणा ॥ २ ॥**
**देवभक्त ऐसी बोली। जंव भ्रांति नाहीं गेली ॥ ३ ॥**
**तंतुपट जेवीं एक। तैसा विश्वेंसी व्यापक ॥ ४ ॥**

शरीरस्थ आत्म्याचे दर्शन चिंतनानेच होऊं शकते. हा नववा मंत्र पहा.—

**एषो ऽणुरात्मा चेतसा वेदितव्यो यास्मिन**

**प्राणः**—पञ्चधा संविवेश। प्राणैश्चित्तं सर्वमोतं प्रजानां यस्मिन् विशुद्धे विभत्येजव आत्मा ॥ ९ ॥

याचा अर्थ असा :—

हया आत्म्यांत पंचप्राण तत्त्व अधिष्ठित आहे. तो सूक्ष्म आत्मा अंतःकरण निर्मल झालें असतां हा आत्मा प्रगट होतो तें मनुष्याचें सर्व अंतःकरण प्राणांनी व्याप्त आहे.

या मंत्रांत आत्मा प्राण व मन यांचा संबंध दाखविला आहे. मनाला प्राणाचा आधार व प्राणाला आत्म्याचा आधार आहे.

हया आत्म्याचें दर्शन बलहीनाला होत नाही. प्रवचनानीं होत नाहीं, तसेंच हा आत्मा प्रमाणशून्य तपश्चर्येनें किंवा ज्ञानहीन कर्मानें होत नाही. हें आत्मज्ञान झाल्यावर शरीर व आत्मा ब्रह्मतत्त्वांत विलीन होऊन जातात.

या संबंधी हा मंत्र पहाः—

**मंत्र ७ वा :** तृतीय मुंडक, द्वितीय खंड ।

**गताः कलाः पञ्चदश प्रतिष्ठा देवाश्च सर्वे प्रतिदेवतासु ।**
**कर्माणि विज्ञानमयश्च आत्मा परेऽव्यये सर्वे एकीभवन्ति ॥**

अर्थः—पिंडाचे ठिकाणी असलेल्या पंधरा कला ( तत्त्वे ) त्यांच्या आश्रयभूत देवतांमध्यें जातात. त्या देवता ब्रह्माडांतील मुख्य देवतांमध्ये लीन होतात. ह्या देवता कर्मे व अंतःकरण ही सर्वश्रेष्ठ अविनाशी तत्त्वांत एकरूप होतात.

मुंडकोपनिषदांत जीव जगत व परमात्मा यांचा पूर्णविचार केलेला आहे. एका अक्षर-ब्रह्मातूनच सर्व विश्व निर्माण होतें आणि त्याच तत्त्वांत सर्व जड चैतन्य सृष्टीचा लय होतो असें स्पष्ट सांगितलेलें आहे.

**हा अद्वैत सिद्धान्त आणि विज्ञानशास्त्र आज अत्यंत जवळ येत चाललेले आहेत.** विज्ञानशास्त्रांत अभूतपूर्व अशी क्रांति झालेली आहे. युरोपीय देशांत आजपर्यंत तर झालेला जडवाद संपूर्ण नाहींसा झालेला आहे. आता विज्ञानशास्त्र सुद्धां या सर्व ब्रह्मांडाचे एकच आदितत्त्व मानूं लागले आहे. **आइन्स्टीनच्या** अनुवादानें प्रचंड क्रांति केली आहे.

प्रत्येक अणुच्या भोंवती १२।१३ इलेक्ट्रॉन्स लंब वर्तुलाकार सतत फिरत असतात आणि तेच चैतन्यस्वरूप आहेत. त्या अणूचे व्यापार अत्यंत नियमबद्ध रीतीने चाललेले आहेत, त्यालाच आपण परमात्मा ईश्वर असे म्हणतो हा ईश्वर सर्वज्ञ, सर्वकर्ता, सर्वहर्ता, सर्ववेत्ता, सर्वशक्तिमान्, सर्वबुद्धिमान्, सर्वकलाकार आहे आणि तोच या जगाचा खेळ आत्म्यांत आखीव पद्धतीने खेळत असतो; जग ही त्याची लीला आहे असेच आपण समजतो पाश्चात्य तत्त्वज्ञ ही आज विज्ञान शास्त्रद्वारा असाच विचार करू लागले आहेत. आणि आपल्या उपनिषदांतील तत्त्वज्ञान जाणून घेण्यासाठीं जास्तीत जास्त प्रयत्नशील आहेत.

अद्वैत सिद्धान्त आमच्या विद्वान द्रष्ट्या ऋषींनी केवळ गूढचिंतनानें मांडला; तोच सिद्धांत आज विज्ञानशास्त्रज्ञ प्रयोगशाळेंत प्रयोग करून सांगत आहेत. एका लवचिक सळईचे एक टोक अद्वैत सिद्धांत आहे आणि त्याच सळीचें दुसरे टोक विज्ञानशास्त्रप्रणीत सूक्ष्म विद्युत्कणसिद्धांत आहे. आणि ही दोन टोकें आज एकत्रित आलीं आहेत आणि हें विश्वचक्र पुन्हां सिद्ध झालें आहे.

**नमः परमर्षिभ्यः**

**( समाप्त )**

# गीतेचें सारभूत मार्गदर्शन

## (लेखांक चौथा).

लेखक—डॉ. ग. य. परांजपे, रत्नागिरी

अर्जुनाने, वरील प्रमाणें नुसताच प्रश्न केला नसून व्यक्त आणि अव्यक्त अशा दोन्ही स्वरूपांची भक्ती करणारांची पद्धती पुढे विशद करून सांगितली आहे—

अर्जुनाने सगुणाची उपासना करणारांना भक्त म्हटले असून अव्यक्ताच्या उपासकांना योगी असें संबोधिलें आहे. 'भक्तीं पाविजे व्यक्त' तर 'अव्यक्त योगें' असे मागे त्यानें म्हटलेंच आहे. आतां त्यानें भक्तांविषयीं काय वर्णन केले आहे ते प्रथम पाहूं.

**ओव्या—**

**तरी तुजलागी कर्म । तूचि जयाचे परम ।**
**भक्तीसी मनोधर्म । विकोनि घातला ॥ २९ ॥**
**इत्यादि पूर्वी परी । जे भक्त तूते श्रीहरी ।**
**बांधोनिया जिव्हारी । उपासिती ॥ ३० ॥**

भावार्थ—ज्यांची कायिक, वाचिक व मानसिक सर्व कर्मे केवळ तुझ्या करितांच होतात. तूंच ज्यांना सर्वश्रेष्ठ विषय झाला आहेस, ज्याच्या मनाचा संकल्प विकल्प हा धर्म जणू कांहीं भक्तीला विकून टाकला गेला आहे, एकूण अशा सर्वच प्रकारानीं ज्या भक्तांनीं तुला आपल्या हृदयांत बांधून ठेवलें आहे व तुझी भक्ती करीत आहेत ते भक्त आणि:—

ओव्या—

आणि जे पैलीकडे। वैखरी येसी जे कानडे।
कायीसयाही सांगडे। नव्हेची जे वस्तु ॥ ३१ ॥
तें अक्षर जी अव्यक्त। निर्देश, देश रहित।
सोहंभावें उपासीत। ज्ञायेनि जें ॥ ३२ ॥
तयां आणि जी भक्तां। येरयेरांमाजी अनंता।
कवणें योगें तत्त्वतां। जाणितला सांगा ॥ ३३ ॥

भावार्थ--- अव्यक्ताची प्राप्ती करून घेणाऱ्यां विषयीं अर्जुन म्हणतो— देवा जें ओंकाराच्या पलीकडचें तत्त्व असून ज्याचें वर्णन वैखरी वाणीनें करतां येत नाहीं, जें कशासारखें आहे तें सांगतां येत नाहीं, जें अविनाशी आणि व्यक्त न दिसणारें, ज्याचा कोणत्याही प्रकारे निर्देश करतां येत नाहीं, जें सीमित नाहीं त्याची सोहंभावानें जे उपासना करतात ते योगी आणि सगुणाची भक्ती करणारे भक्त या दोहोंमध्यें खरोखर योग कोणी जाणला? तें मला सांग.

अर्जुनाच्या वरील प्रश्नाचें उत्तर त्याचे जवळ तयारच होतें. परंतु त्याच्या उत्तराला भगवंतांचा दुजोरा मिळत नव्हता. तो दुजोरा त्याला पाहिजे होता. शास्त्रप्रचीति, गुरुप्रचीति आणि आत्मप्रचीति या तिन्हींची सांगड जमली म्हणजे तें ज्ञान पक्कें होत असते. मनांत विकल्प येत नाही. मनबुद्धीचें ऐक्य होऊन तीं भगवंताला समर्पित होतात. यासाठी त्रिविध प्रचीतीचे महत्त्व शास्त्रांनी गायिलें आहे.

अर्जुनाचा उत्तरगर्भ प्रश्न ऐकून अर्जुनाच्या प्रश्नांतील वरील खोंच भगवंतांनी जाणली. ते अर्जुनाच्या या प्रश्नावर अत्यंत खूष झाले. अर्जुना, ' प्रश्न कसा करावा हें तूं उत्तम प्रकारे जाणतोस, असें म्हणून त्यांनीं अर्जुनाच्या प्रश्नाचें संतोषानें सहर्ष स्वागत केलें. आणि पुढील प्रमाणें आपले निःसंदिग्ध मतही त्यानीं देऊन टाकलें. तें मत अर्जुनाच्या अपेक्षेप्रमाणेंच आहे. हे आपल्या सहजच ध्यानीं येईल. पहा भगवान म्हणतात.—

ओव्याः—

तरी अस्तगिरीचिया उपकंठीं। रिगालिया रविबिंबापाठीं।
रश्मी जैसे किरीटी। संचरती ॥ ३५ ॥

कां वर्षाकाळीं सरिता । जैसी चढों लागे पांडुसुता ॥
तैसी नीच नवी भजतां । श्रद्धा दिसे ॥ ३६ ॥
परी ठाकिलियाहि सागरू । जैसा मागीलही यावा अनिवारू ।
तिये गंगेचिये ऐसा पडिभरू । प्रेमभाव ॥ ३७ ॥
तैसें सर्वेंद्रियां सहित । मजमाजीं सूनि चित्त ॥
जे रात्री दिवस न म्हणत । उपासिती ॥ ३८ ॥
इयापरी जे भक्त । आपणचे मज देत ।
तेचि मी योगयुक्त । परम मानी ॥ ३९ ॥

भावार्थः—भगवान म्हणतात, अर्जुना—अस्ताचे वेळीं सूर्य डोंगराआड गेला म्हणजे त्याचे फिरणेंहि त्याचें मागोमाग जातेंच ! किंवा पावसाळ्यात नदीचे पाणी ज्याप्रमाणें वाढत जातें, त्याप्रमाणें ज्यांची श्रद्धा, भक्ती ही निरंतर माझेकडे, व वाढतच असते एवढेंच काय? नदी समुद्राला मिळून तिचे समुद्राशीं एक्य होत असतें त्याचवेळीं मागील लोंढे सतत मिळत राहून हा ऐक्यतेचा खेळ अव्याहत चालूच राहतो त्याप्रमाणेंच भक्त हे प्रेमभावानें माझ्याशीं ऐक्य पावूनहि निरंतर चढत्या वाढत्या प्रेमानें अखंड ऐक्यसुख भोगीतच असतात. आत्मतत्वानें ते एकरूपच झाले तरी, सर्वेंद्रियांसह आपले चित्त माझ्यांत रोंवून ते रात्रंदिवस माझीच उपासना करीत असतात. अशा प्रकारें सगुण व निर्गुण दोन्ही अंगानी आपले सर्व कांहीं मलाच देऊन जे माझी भक्ती करतात 'ते मी परम योगयुक्त म्हणतो'

भगवंतांनीं सर्वेंद्रियांसहवर्तमान सगुणाची भक्ती करणारे भक्त हेच मला युक्ततम वाटतात असें स्पष्टपणें सांगितलें आहे. अर्जुनानें भगवंताला तौलनिक दृष्टया अधिक प्रिय कोण, हेंच विचारलें होतें. दोन्ही भक्त हे योग युक्त नाहींत असें नाहीं परंतु, त्यांत तर तमभाव मात्र निश्चित आहे. अर्जुनाला तसा तो वाटला व भगवंतांनीं त्याला पूर्ण दुजोरा दिला. आतां दुसरा जो अव्यक्ताची उपासना करणारा योगी, तो युक्ततम नाहीं हें स्पष्टच आहे. तथापि अशा योग्यांना भगवंतांनीं त्याज्य ठरविलें नाहीं, तर 'तेहि मातेंचि किरीटी पावती गा!' म्हणजे तेहि मलाच पावतात असें म्हटलें आहे. कारण स्पष्टच आहे, अव्यक्त स्वरूप हेंहि भगवंताचेंच रूप आहे.

आतां भगवान सगुण भक्तालाच अधिक श्रेष्ठ कां मानतात, याचा आपण विचार करूं. सगुणाची भक्ती करणारा भक्त हा सगुण श्रीहरी हा अव्यक्त आणि विश्वरूपहि आहे हें जाणूनच सगुणाची भक्ति करीत आहे. व येथें तुलनेकरितां असाच भक्त घेतलेला आहे. या भक्ताची धारणा, सगुण निर्गुण आणि विश्वरूप अशा सर्व द्वैतपसाऱ्यासह एकच परमात्मा आहे ही आहे. म्हणजे द्वैतरूपानें सर्व अद्वैताचाच खेळ तो मानीत आहे. यांत देव आणि भक्त तोच. अहंभावनेला यांत स्थानच रहात नाही. आणि विशेष प्रेमाचा किंवा आनंदाचा अनुभव हा या सगुण भक्तींतच घेतां येतो.

योगी हा भगवंतानें दिलेलें संपूर्ण ऐश्वर्य हें त्याज्य ठरवून सोऽहंभावानें निराकाराला झोंबूं पहातो. त्यासाठीं त्याला सोहंभाव सतत धरावा लागतो. कारण कसें झालें तरी तो देहवंत आहे. निसर्गाच्या विरुद्ध दिशेनें त्याचे प्रयत्न चाललेले असल्यानें त्याला कष्ट फार होतात. एवढें मला निश्चित. या शिवाय ते मिळवतात काय? तर 'आपुलीये साटो वाटी। शून्य घेता उठाउठी !' म्हणजे आपल्या मोबदल्यानें शून्य ब्रह्माची प्राप्ती करून घेतात. 'योगियांचे ब्रह्म शून्य' असेंच तुकोबा म्हणतात. आणि शून्य ब्रह्म म्हणण्याचे कारण, तें ! परब्रह्म किंवा पूर्णब्रह्म नव्हे !

आपण योगी आणि भक्त यांची तुलना तूर्त बाजूला ठेवूंया भक्ताविषयीच भगवंतानीं येथें गौरवोद्गार काढले आहेत हें निश्चित ! बाराव्या अध्यायांत याची उत्तमोत्तम लक्षणें सांगून झालीं, परंतु तो ज्ञानी जर भक्त असेल तरच भगवंताला अत्यंत प्रिय होतो असें वर्णन पुढें चवदाव्या श्लोकापासून आलें आहे.

यो मद्भक्तः स मे प्रियः श्लोक १४
भक्तिमान्यः स मे प्रियः ॥ १७
भक्तिमान्मे प्रियो नरः ॥ १९
भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥ २०

बाराव्या अध्यायाचा नीट विचार केला तर त्यांत भक्तीचीच प्रशंसा केलेली आढळेल व ती भक्ती म्हणजे सगुणाची भक्तीच होय. ज्ञानी झाला,

तरीहि तो भक्त असेल तरच भगवंताला अत्यंत प्रिय होतो, असेंच वरील श्लोकांत भगवंतानीं आवर्जून सांगितलें आहे. ज्ञानेश्वरांच्या पुढील दोन ओव्यांचा विचार केला म्हणजे या बाबत शंका रहाणार नाहीं.
ओव्या—

हें विश्वचि माझें घर । ऐसी मति जयाची स्थिर ।
किंबहुना चराचर । आपण जाहला ॥ १२/२१३
मग याहीवरी पार्था । माझिया भजनी आस्था ।
तरी तयातें मी माथां । मुकुट करीं ॥ १२/२१४

या दोन ओव्यांचा एकत्र विचार करणें आवश्यक आहे. परंतु पुष्कळ लोक वरील एकाच ओंवीचा आधार घेतात. दुसऱ्या ओंवीचें महत्व अधिक ठसावें याच करतां वास्तविक वरील पहिली ओंवी ज्ञानेशांनीं घातली आहे. पहिल्या ओंवींत ज्ञानी पुरुषांचें वर्णन आहे. ज्याचा सर्वात्मभाव झाला आहे असा ब्रह्मवेत्ता पुरुषच अवघें विश्व हें माझें घर आहे असें यथार्थ म्हणू शकतो, एवढेंच नव्हे तर हे सर्व मीच आहे अशी त्याची अनुभवाची धारणा असते यांत भगवंत आणि मी हे द्वैतही नसते तर मीच भगवंत अशी भावना झालेली असते आणि खऱ्या बोधाच्या दृष्टीनें मीच ब्रह्म वाटणें हीच मोठी उणीव ठरते खऱ्या ब्रह्माला मी ब्रह्म असें भानहि असतां कामा नये हे भान होणे म्हणजे तें द्वैत होते खऱ्या अद्वैतांत अद्वैत आहे असे भान होणे हेच द्वैतभान आहे.

द्वैत नाही जगीं मीच एकला एकू ।
येणेहि स्फुरणे आला अभिमान घातकू ॥

असें नाथांनी या स्थितींचे वर्णन केले आहे स्थसमूळ अहंकाराचा नाश एका भक्तीमुळेच होतो म्हणून 'याहीवरी पार्था ॥ माझिया भजनी आल्या । ' असे भगवंतांनी म्हटले आहे. अशा भक्ताला भगवंत डोकीवर घेऊन नाचतात !
अर्जुनाला पूर्ण ज्ञान प्राप्त झालें आहे हें दहाव्या अध्यायांत त्याच्याच

उद्गारांवरून आपण पाहिलेंच आहे. ज्ञानापेक्षांहि त्याला जी भक्तीची अधिकता वाटत होती तीच बाराव्या अध्यायांतील त्याच्या प्रश्नाने प्रकट झाली आहे.

' मन्मना भव ' या पदाचा अर्थ करून घेण्यासाठीं आपण येथें बाराव्या अध्यायापर्यंत गीतेचा मागोवा घेतला. त्यांत सगुणभक्तीच सर्वश्रेष्ठ असल्याचें आपण खात्रीपूर्वक निर्धारलें आहे. याच संदर्भाने आतां ' मन्मना भव ' या पदांचा आणि संपूर्ण श्लोकांचा योग्य अर्थ ध्यानीं घेण्याला अधिक समर्थ ठरणार आहोत. या श्लोकावरील ज्ञानोबांनी केलेलें विवरण आपल्या नीट ध्यानी येणें आतां अधिक स्पष्ट व सोपें होईल म्हणून आतां श्लोकाच्या विवेचनाला पुढील लेखांत सुरुवात होईल. गीतेंतील सारभूत सिद्धांताच्या आपण अगदीं जवळ आलों आहों. पुढील लेखांत अत्यंत गोड असा विषय येणार आहे.

( अपूर्ण )

# ॥ शिरडीची वाट ॥

पाऊलें चालती शिरडीची वाट ।
देखण्यास साई-दर्शनाचा थाट ।
प्रथम दर्शन समाधि मंदिराचें ।
मना शांती लाभे रूप देखोनि मूर्तीचे ॥
आलों द्वारकामाई साई तुझ्या पायीं ।
तूंच आमुचा पिता धनी आमुची आई ।
कास धरोनीयां श्रद्धा सबूरीची ।
चढलों पायरी तुझ्या चावडीची ॥
गुरुपादुका निंबातळीं देखियल्या ।
लेंडीबागेंत जाऊनि विसावा घेतला ॥
ताटातुटी तुझी सहन होईना ।
पण संसाराची माया सोडवेना ।
साईनाथा आतां सांभाळी या भक्ता ।
तुझ्या पायीं आतां ठेवितों मी माथा ॥

— सुरेश अ. महाडदळकर.

**Books published and sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

## श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र (मराठी) श्री. दाभोळकरकृत | | ८-०० |
| (२) | ,, | (हिंदी) श्री. ठाकूर | ५-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) श्री. सोमपुरा | — |
| (४) | ,, | (इंग्रजी) Shri Gunaji | ५-२५ |
| (५) | ,, | (Kannad) N. S. Anantha Raum | ६-०० |
| (६) | A Glimpse of Indian Spirituality–by Pradhan | | १-५० |
| (७) | A Glimpse of Indian Spirituality (Telugu) | | १-०० |
| (८) | श्रीसाईलीलामृत (मराठी) श्री. आगास्करकृत | | २-७५ |
| (९) | साईबाबा-अवतार व कार्य (मराठी) श्री. धोंड | | २-०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय (मराठी) श्री. दासगणू | | ००-५० |
| (११) | सगुणोपासना (मराठी) श्री. भीष्म | | ००-२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | श्रीरुद्राध्याय ११ वा (मराठी) श्री. दाभोळकर | | ००-१२ |
| (१४) | शीलधी (मराठी) डॉ. गव्हाणकर | | ००-७५ |
| (१५) | श्रीसाईगीतांजलि (मराठी) कवि श्रीपाद | | ००-१२ |
| (१६) | Guide to Shirdi (English) | | ००-१२ |
| (१७) | स्तवनमंजिरी व सुमनांजलि (मराठी) | | ००-२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 P. and 50 P. for No. 1. Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* :

1. **Receiver Shri Sai Baba Sansthan,**
   P. O. Shirdi., Dist. Ahmednagar.

2. **Sai Baba Office ' Sai Niketan,'**
   Dr. Ambedkar Road, 804 B, Dadar, Bombay 14.